



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## संभाजीनगरात 10 स्वीकृत नगरसेवकपदांसाठी 50 बंडखोरांना दिलेला शब्द येणार अंगलट

- 5 जागांवर भाजप, 3 जागा एमआयएमला तर शिंदेसेनेला 1 स्वीकृत नगरसेवक निवडता येणार



**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेक प्रभागांमध्ये पक्षांतर्गत बंडखोरी उफाळून आली होती. ही बंडखोरी रोखण्यासाठी आणि अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा करण्यासाठी सर्वच पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी अनेक इच्छुकांना निवडणुकीनंतर स्वीकृत नगरसेवक म्हणून तुमची वर्णी लावू, असा शब्द दिला होता. यामध्ये प्रामुख्याने भाजपने 15 ते 20, शिवसेनेकडून 12 ते 15, एमआयएमकडून 8 ते 10, उबाठाकडून 8 ते 10 तर काँग्रेस, राष्ट्रवादी, वंचित यांनीदेखील आपल्या कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्यपदी घेण्याचा शब्द दिलेला आहे. स्वीकृत सदस्यांची संख्या 5 वरून 10 झाली असली तरी इच्छुकांची गर्दी पाहता नेत्यांचा मोठा कस लागणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाने मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या महापालिकांमध्ये स्वीकृत सदस्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता. महापालिकेच्या एकूण सदस्य संख्येच्या 10 टक्के किंवा 10 सदस्य (यापैकी जी संख्या कमी असेल) इतके स्वीकृत नगरसेवक निवडले जाऊ शकतात, असे राजपत्र 23 मार्च 2023 रोजी काढलेले आहे. यामुळे काहीशा प्रमाणात नेत्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. सध्याच्या संख्याबळानुसार 5 जागांवर भाजप, 3 जागा एमआयएमला तर शिंदेसेनेला एक स्वीकृत नगरसेवक निवडता येणार आहे. उद्धवसेना, वंचित यांच्याकडे त्या तुलनेत संख्याबळ नाही. स्वीकृत नगरसेवक पदावर संधी मिळावी यासाठी पराभूत उमेदवारांकडूनही फील्डिंग लावली जात आहे.

ज्या अनुभवी कार्यकर्त्यांना किंवा ज्येष्ठ नेत्यांना काही कारणास्तव प्रत्यक्ष निवडणुकीत उतरता आले नाही, त्यांच्यासाठी हे पद राजकीय पुनर्वसन करण्याचे प्रमुख साधन आहे. स्वीकृत नगरसेवक निवडण्यासाठी महापालिका प्रशासनाचा अनुभव, सामाजिक कार्याचा किमान 5 वर्षांचा अनुभव किंवा डॉक्टर, वकील, इंजिनिअर यांसारख्या क्षेत्रातील विशेष पदवी असणे आवश्यक आहे. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रत्येक राजकीय पक्षाला स्वीकृत नगरसेवक पदे दिली जातात. स्वीकृत नगरसेवकांना महापालिकेच्या सभांमध्ये चर्चेत सहभागी होता येते.

> या निवडणुकीत भाजपकडे 1400 पेक्षा अधिक उमेदवारांनी उमेदवारी मागितली होती. शिवसेनेकडे देखील 900 पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज सादर केले. एमआयएमकडे 700 पेक्षा अधिक, उद्धवसेनेकडे 600 पेक्षा अधिक उमेदवारांनी तिकिटाची मागणी केली होती. यातील उमेदवारी न मिळालेल्या शेकडो लोकांनी बंडखोरी केली. भाजपच्या विरोधात तर मोर्चे, निदर्शने आणि आंदोलन झाले. या सर्वांना पक्षांतील नेत्यांनी स्वीकृत नगरसेवक म्हणून घेऊ, असा शब्द दिला आहे. यामुळे आता हा शब्द पूर्ण करताना नेत्यांना पुन्हा एकदा रोष पत्करावा लागणार आहे.

## पालकमंत्र्यांच्या कन्या हर्षदा शिरसाट यांच्यासह समर्थकांचे शस्त्रांसह तांडव

### शिंदेसेनेच्या नगरसेविकांनी विजयी मिरवणुकीमध्ये नाचवल्या तलवारी



**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका निवडणुकीच्या विजयाचा गुलाल उधळताना सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनीच कायद्याचे धिंडवडे काढल्याचा प्रकार घडला, शिंदेसेनेकडून विजयी झालेल्या उमेदवार आणि पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या कन्या हर्षदा शिरसाट यांच्यासह राजू राजपूत आणि अभिजित जीवनवाल यांनी भररस्त्यात तलवारी नाचवली. याप्रकरणी अभिजित जीवनलाल यांच्यावर वेदांतनगर पोलिस ठाण्यात शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, विजयानंतर हर्षदा शिरसाट आणि त्यांच्या समर्थकांनी शहरात मोठी विजयी मिरवणूक काढली. या वेळी वाहनावर उभे राहून नवनिर्वाचित नगरसेविका हर्षदा शिरसाट, राजू राजपूत आणि अभिजित जीवनवाल यांनी हातात तलवारी घेऊन त्या हवेत भिरकावल्या. कायदा हातात घेणाऱ्या नवनिर्वाचित नगरसेवकांवर पोलिस प्रशासन काय कारवाई करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे भाजपचे उमेदवार संजय बारवाल यांच्या घरासमोर हा प्रकार घडला. बारवाल कुटुंबीयांनी केलेल्या आरोपांनुसार, अभिजित जीवनवाल आणि त्यांच्या समर्थकांनी बारवाल यांच्या दारासमोर दोन तास धुमाकूळ घातला. तलवारी नाचवून दहशत निर्माण केली. इतकेच नव्हे तर आमच्या मुलालाही मारहाण करण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप चारवाल कुटुंबाने केला आहे.

## मतदान न करणाऱ्यांवर 'रामबाण उपाय'ची भाषा

### आमदार अब्दुल सत्तारांसह निवडणूक अधिकाऱ्यांना सिल्लोड न्यायालयाची नोटीस



**सिल्लोड : (समर्थ गांवकरी)**

सिल्लोड–सोयगाव 2024 च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवार असलेले आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रचाराच्या शेवटच्या जाहीर सभेत तालुक्यातील मतदारांना उद्देशून धमकीवजा वक्तव्य केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ज्या मतदारांनी आपल्याला मतदान करणार नाही, त्यांची नावे गुप्तपणे चिठ्ठीद्वारे कळविण्याचे आवाहन करत अशा मतदारांवर "रामबाण उपाय" केला जाईल, अशी भाषा वापरण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. यामध्ये गोळ्या देणे, इंजेक्शन देणे, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी किंवा बायपास शस्त्रक्रियेचा उल्लेख केल्याचा आरोप आहे. या कथित धमकीपूर्ण भाषणाविरोधात सामाजिक कार्यकर्ते गणेश शंकरलाल शंकरपेल्ली यांनी सी-विजिल ॲपद्वारे तसेच सिल्लोड येथील निवडणूक अधिकारी लतीफ पठाण यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, आदर्श आचारसंहिता पथकाचे तत्कालीन प्रमुख दादराव श्रीपत अहिरे यांनी आमदार अब्दुल सत्तार यांचा बचाव करत तक्रार फेटाळल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

या कथित धमकीपूर्ण वक्तव्याविरोधात सामाजिक कार्यकर्ते गणेश शंकरलाल शंकरपेल्ली यांनी दुसऱ्याच दिवशी सी-विजिल ॲपद्वारे तसेच सिल्लोड येथील निवडणूक अधिकारी श्री. लतीफ पठाण यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, आदर्श आचारसंहिता पथकाचे तत्कालीन प्रमुख दादराव श्रीपत अहिरे यांनी आमदार अब्दुल सत्तार यांचा बचाव करत तक्रार फेटाळल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.यानंतर तक्रारदारांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. सुमारे एक वर्ष पाठपुरावा करूनही जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर तक्रारदारांनी सिल्लोड न्यायालयात पार्टी इन पर्सन म्हणून खाजगी फौजदारी तक्रार दाखल केली.

## काका पुतण्यांनी एकत्र शड्डू ठोकूनही मनपात निवडणुकीत हाती लागला भोपळा

### आता झेडपी, पंचायत समितीला शरद पवार गट तुतारीचा 'गळा' दाबून घड्याळाचे काटे फिरवणार!

**(समर्थ गांवकरी)**

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची अत्यंत दयनीय अवस्था झाली. या दोन्ही पक्षांची अक्षरश: वाताहात झाली असून बालेकिल्ले सुद्धा ढासळले आहेत. अशा स्थितीत आता दोन्ही राष्ट्रवादीच्या मनोमिलनाची चर्चा रंगली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार याची चर्चा शिगेला पोहोचली असतानाच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीमध्ये तुतारीचा गळा आवळून घड्याळाच्या चिन्हांवर लढण्याची तयारी शरद पवारांच्या पक्षाकडून करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



महापालिका निवडणुकीमध्ये झालेल्या दयनीय अवस्थेनंतर दोन्ही पक्षांमधील मत विभाजन टाळण्यासाठी घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यावर दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाल्याची माहिती आहे. काल (17 जानेवारी) झालेल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, जेष्ठ नेते जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार यांची एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी त्यांना अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केल्याची माहिती आहे. मत विभाजन टाळून एकत्र लढल्यास फायदा होईल अशी भूमिका शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून घेतली जात आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वीच म्हणजेच 16 जानेवारी पासून राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे.




# ह. भ. प. ज्ञानदेव उर्फ आप्पा माऊली देशमुख यांचे निधन



**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील जवळेकडलग येथील ह.भ. प. ज्ञानदेव देशमुख (माऊली) यांचे निधन झाले आहे. श्रीक्षेत्र नारायणपूर देवस्थान चे परमपूज्य कै. अण्णा महाराज यांचे परम शिष्य व वारकरी ज्ञानदेव देशमुख यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

दत्त महाराजांचा वारकरी हरपल्याने सर्वांनाच धक्का बसला. सर्वांना आनंद देणारे सर्वांना बरोबर घेऊन चालणारे ते एकटेच गेले. 'आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना' या रितीप्रमाणे जवळेकडला परिसरातील सर्वांचे लाडके आप्पा आज निघून गेले.

माणसातला माणूस जागा करा हा संदेश सद्गुरु अण्णा महाराजांनी सर्वांना दिला आणि हाच संदेश १९८६ पासून सर्व दत्त सेवेकरी जन जागृतीची मोहीम सुरू केली ती आजता गायत आप्पांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. तब्येतीची सुधारणा होत असताना अचानक आप्पांचे जाणे मनाला चटका लावून गेले. सुभाष खडांगळे आप्पांचे परममित्र राहायला शेजारी शेजारी घर. शाळेत पुढे बरोबर शिकलो. परमार्थ करत असताना आदरणीय मोरेदादांच्या म्हणजेच स्वामी समर्थांच्या दरबारात गेलो. त्यानंतर श्री क्षेत्र मढी येथे देखील काही दिवस स्व.संभाजी राजे थोरात स्व.रामनाथ बबन देशमुख आप्पा माऊली दर अमावस्येला जात असत. त्यानंतर श्री क्षेत्र नारायणपूर क्षेत्राची ओळख झाली आणि सद्गुरु नारायण महाराजांच्या सानिध्यात गेलो आणि दत्तमय होऊन गेलो. साक्षात दत्त महाराज म्हणजे अण्णा महाराज आमच्यावर पोटच्या मुलापेक्षा जास्त प्रेम करत असत. आजही सद्गुरु अण्णा महाराजांचे सानिध्य आम्हाला स्वप्नामध्ये, प्रत्यक्षात जाणवते. सद्गुरु नारायण महाराजांनी आप्पा माऊली यांना भरभरून प्रेम दिले. साधारणतः दोन हजार शिष्यांमध्ये आप्पा माऊली हे अतिशय प्रिय शिष्य होते . महाराजांच्या आवडीनिवडी आप्पांनी लक्षपूर्वक पाहिल्या त्या पद्धतीने त्यांनी त्या आत्मसात करून त्यांचा विश्वास संपादन केला. आणि त्याचबरोबर चार धाम चार स्थापनेच्या कार्यात जागा शोधण्यापासून तर मंदिर पूर्ण होईपर्यंत अण्णांच्या पावलोपावली बरोबर राहिले. इतकेच नव्हे तर कलकत्त्याला मंदिराचे अधिपती म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. हे कर्तुत्व साध्य करणारे आप्पा माऊली खरोखरच भाग्यवान शिष्य व अधिकारी व्यक्ती होते. सद्गुरु नारायण महाराजांचे आप्पांवर इतके प्रेम होते की एकदा प्रवासामध्ये आप्पांचे बनियन फाटले व असता सद्गुरु अण्णांनी ते बनियन स्वतः शिवून दिले. आप्पा माऊलींनी खरोखर खऱ्या अर्थाने परिपूर्ण असे अध्यात्मिक जीवन जगले त्यांच्या जीवनात अध्यात्म सोडून दुसरा विषय नव्हता .गावापासून अध्यात्माची सुरुवात करून संगमनेर अकोले सिन्नर हा भाग त्यांनी दत्त सेवेसाठी पिंजून काढला कित्येक आदिवासींच्या घरात त्यांनी ज्ञानाचा दिवा लावला .माणसातल्या माणूस खऱ्या अर्थाने जागृत करण्याचे कार्य करता करता आप्पांना हा आजार केव्हा झाला हे सुद्धा कळले नाही. पण या आजाराचा थोडा सुद्धा परिणाम त्यांच्यावर नव्हता .मरणाला काहीतरी निमित्त हवे म्हणून ते निमित्ताने गेले.

परंतु त्यांचे कार्य दत्त भक्तांच्या आणि सामान्यजणांच्या मनामनात कायम प्रेरणास्त्रोत म्हणून अमर राहील.

# जगदगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे ठाण्यात भव्य स्वागत

■ कच्चे बंधारे संकल्पपूर्ती सोहळा उत्साहात संपन्न



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जगद्गुरू रामानंदाचार्य दक्षिणपीठ, श्रीक्षेत्र नाणीजधाम पिठाचे पीठाधीश्वर प.पु. रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या आगमनानिमित्त दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी ठाणे येथील टिपटॉप हॉटेलमध्ये भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याचवेळी कच्चे बंधारे संकल्पपूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड तसेच सौ. अमृता देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासोबतच संपूर्ण महाराष्ट्रातील पिठाचे पीठप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थानाच्यावतीने अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रभर ४,५९८ कच्चे बंधारे उभारण्यात आले. या उल्लेखनीय कार्याची संकल्पपूर्ती प.पु. रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मान्यवरांच्या हस्ते भव्य व दिव्य स्वरूपात संपन्न झाली. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच संपादक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना प.पु. रामानंदाचार्यजींनी विज्ञान, व्यवहार आणि अध्यात्म यांचा समन्वय साधत विचार मांडले. यावेळी त्यांनी सांगितले की, "धर्मगुरू या नात्याने आम्ही हिंदू धर्माचे कार्य करीत आहोत. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या भूलथापांना बळी पडलेल्या हिंदू बांधवांना विधिवत हिंदू धर्मात पुनःप्रवेश देत आतापर्यंत १,५३,३४३ कुटुंबांचे घरवापसी करण्यात आली आहे." तसेच 'जगद्गुरू के प्रेम हेतु – एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत संपूर्ण महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये १,११,४२४ वृक्षारोपण करण्यात आले.

# अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे तळेरान येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन" या संकल्पनेवर आधारित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन तळेरान ता. जुन्नर येथे करण्यात आले आहे.सदर सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.या शिबिराच्या आयोजनाची माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.राजेंद्र आंबवणे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी दिली. उद्घाटन समारंभासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.कल्याण सोनावणे व तळेरान गावाचे लोकनियुक्त सरपंच गोविंद साबळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व राष्ट्रीय सेवा योजनेच्या गीताने करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व शिबिराची संकल्पना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.राजेंद्र आंबवणे यांनी मांडली. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात त्यांनी शिबिराच्या सात दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता,वृक्षारोपण,पाणी संवर्धन, पाणलोट क्षेत्र विकास,पडीक जमिनीचे व्यवस्थापन, सामाजिक जनजागृती,आरोग्य व स्वच्छता विषयक उपक्रम, तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे सरपंच गोविंद साबळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून गावागावांत राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी उपक्रमांचे कौतुक केले.

# भास्कर राठोडची सैन्य दलात भरती

**भवानी तांडा : (समर्थ गांवकरी)**

गरिबी, हालअपेष्टा आणि संघर्षावर मात करत भास्कर बाबू राठोड याने अत्यंत कमी वयात भारतीय सैन्य दलात नोकरी मिळवून भवानी तांड्याचे नाव उज्वल केले आहे. भास्करच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असून परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. भास्करचे वडील बाबू रुपाला राठोड हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अपुऱ्या उत्पन्नातही त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम घेतले.

"मजुरीचे कष्ट आणि शिक्षणाची साथ यामुळेच आज मुलाने यश मिळवले," अशी भावना गावकऱ्यांतून व्यक्त होत आहे. वडिलांच्या कष्टाचे चीज भास्करने सैन्य दलात भरती होऊन केले असल्याचे बोलले जात आहे.

# मॉडर्न ज्युनिअर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळ, अहिल्यानगर संचलित मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स,सोमचंद शहा कॉमर्स व भास्करराव कदम गुरूजी सायन्स, अकोलेच्या राष्ट्रीय सेवा योजना( एन.एस. एस.) + 2 स्तर विशेष हिवाळी शिबीराचा उद्घाटन समारंभ मौजे शेरणखेल ,ता. अकोले

जि .अहिल्यानगर या ठिकाणी उत्साहात संपन्न झाला . याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य श्री. दिलिपभाई शहा यांनी अध्यक्षपद भूषविले.प्रमुख पाहुणे म्हणून गुरूवर्य मोरेश्वरजी धर्माधिकारी यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यादरम्यान त्यांनी श्रमाचे व संस्कारांचे जीवनातील मूल्य, युवकांनी परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करावी,स्वयंसेवकांनी हे गुण अंगिकारले तर सुसंस्कृत समाज तयार होईल याचे सर्व श्रेय स्वयंसेवकांना मिळेल यासाठी संस्कृतमधील श्लोकांचा आधार त्यांनी घेतला.याप्रसंगी शेरणखेल गावचे ग्रामस्थ विनोद हांडे, प्रकाश कासार, मच्छिंद्र कासार, निवृत्ती सूर्यवंशी, रामचंद्र कासार,विजया कोकणे, ग्रामसेवक संतोष देशमुख,जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री वायाळ सर, कानवडे सर,हासे सरआदी उपस्थित होते. त्याचबरोबर ज्युनिअर कॉलेजचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य दीपकजी जोंधळे यांनी या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यक्षीय सूचना सहा.कार्यक्रम अधिकारी केदार भिंगारदिवे यांनी केली व त्यास सहा.कार्यक्रम अधिकारी ऋषिकेश नगरकर यांनी अनुमोदन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.कार्यक्रम अधिकारी कोल्हे .एम.जी.यांनी केले.तर मुख्य कार्यक्रम अधिकारी संपत वाळके यांनी आभार मानले.




# मकर संक्रांतीनिमित्त भव्य हळदी-कुंकवाचा कार्यक्रम



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

चैतन्य फाऊंडेशन यांच्या वतीने प्रगती व्यासपीठ हॉल येथे मकरसंक्रांतीनिमित्त हळदी-कुंकवाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. महिलांचा सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम विशेष ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाथर्डी नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा सौ.. मंगलताई कोकाटे या होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका सौ. शारदाताई गर्जे, नगरसेविका सौ. वर्षाताई मोरे तसेच महिला बचत गटांच्या सहयोगिनी श्रीमती भारतीताई असलकर उपस्थित होत्या.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना सौ. मंगलताई कोकाटे यांनी चैतन्य ग्रुप सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असून, विविध व्यवसायांच्या माध्यमातून प्रामाणिक व पारदर्शक कार्यपद्धतीमुळे नावारूपाला आला असल्याचे गौरवोद्गार काढले.

डॉ. शारदाताई गर्जे यांनी आपल्या भाषणात महिलांची क्षमता अधोरेखित करत, "आजचा कार्यक्रम हा केवळ हळदी-कुंकवा पुरता मर्यादित नसून स्त्रीच्या सन्मानाचा उत्सव आहे. समाजाची गरज ओळखून कार्य करणारे चैतन्य ग्रुपचे अध्यक्ष श्री अनंत ढोले यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभारलेला चैतन्य ग्रुप अभिमानास्पद आहे," असे नमूद केले.

श्रीमती भारतीताई असलकर यांनी चैतन्य परिवाराने तळागाळातील घटकांना सातत्याने मदत केल्याचे सांगून, महिला बचत गटांना कर्ज उपलब्ध करून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात श्री. अनंत ढोले यांचा मोलाचा वाटा असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात चैतन्य फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. मंगल ढोले यांनी उपस्थित सर्व महिलांचे स्वागत करून मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या व हळदी-कुंकवाच्या निमित्ताने सर्व महिलांचा सन्मान केला.

या कार्यक्रमास सौ. अनुजा कुलकर्णी, विवेकानंद विद्यालय पाथर्डीचे मुख्याध्यापक व महिला शिक्षिका सौ. मोहिनीताई गोसावी, सौ. रेश्मा राठोड, सौ. मीना ढोले, सौ. वर्षाताई वाघ, सौ. मीराताई वाघ, सौ. ज्योतीताई आंधळे, श्रीमती अनिता काटकर, सौ. सारिका मराठे आदींसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चैतन्य ग्रुपचे सरव्यवस्थापक श्री बापू पायघन यांनी केले तर सूत्रसंचालन सौ. वर्षा वाघ यांनी केले.

महिला सन्मान व सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम सर्वांच्या प्रशंसेस पात्र ठरला.



# बाळासाहेब पांडे यांची निवड

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील माजरंम येथील आदर्श शिक्षक व पत्रकार बाळासाहेब पांडे हे चांगले व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेल्या मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा अत्यंत मानाचा राज्यस्तरीय 'दर्पण बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' जेष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांना जाहीर झाला असून त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यात आली आहे.

# मनपा निवडणुकीत भाजपा ला मोठं यश मिळाल्या तामशात भाजपच्या विजयाचा जल्लोष पटाखे फोडून आंनदोस्तव साजरा



**तामसा: (समर्थ गांवकरी)**

नांदेड सह संपूर्ण महाराष्ट्रात मनपा निवडणुकीत भाजप, शिवसेना महायुती चा एकतर्फी विजय मिळाल्या बद्दल तामसा येथे महायुती च्या कार्यकर्तानी पटाखे फोडून आंनद साजरा करत जल्लोष केला. नांदेड मनपा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण,खा अजित गोपछडे,संजय कोडगे,जिल्हा अध्यक्ष ॲड किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शन खाली पारपडलेल्या निवडणुकीत मोठं यश संपादन केलं. नांदेड येथील विभिन्न प्रभागात हदगांव हिमायतनगर च्या पदाधिकारी तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचाराची जिम्मेदारी सोपवण्यात आली होती ही जिम्मेदारी यशोरीती पार पाडण्यात आली. तामसा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पटाखे फोडून जल्लोष साजरा करण्यात आलं या वेळी डॉ. दीपक नाईक, डॉ संदीप कारंजकर, माजी सरपंच प्रतिनिधी माधव नारेवाड, माजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती विशाल परभणकर, ग्रा. प. सदस्य शिवराज वारकड, पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, संजय सोमेवाड, सचिन तांदळे,महिला तालुका अध्यक्ष प्रतिनिधी अर्जुन जोशी, सामाजिक कार्यकर्ते जिया भाई बागवान, राष्ट्रवादी कांग्रेस चे पप्पू कदम, लक्की कोठुळे, शुभम यंगळवार अरविंद हुंडेकर, दत्ता दुगाळे, गंगाप्रसाद नामेवाड, किराणा असोसिएशन चे अध्यक्ष मनोज नील्लावार,मुन्ना सेठ उत्तरवार, अमोल दंतपल्ले,सोनू वाळके, गोपी लाहोटे सह असंख्य महायुती चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/०६/२०२६ अकोले दि. १६/०१/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. लहानु नामदेव भवर, रा. डोंगरगाव**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. नामदेव तुकाराम भवर यांचा मृत्यू दि. २८/०४/१९९८** रोजी **मौजे डोंगरगाव** येथे झाला असुन त्यांच्या **वडिलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय डोंगरगाव**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. लहानु नामदेव भवर, रा. डोंगरगाव**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. नामदेव तुकाराम भवर यांचा मृत्यू दि. २८/०४/१९९८** रोजी **मौजे डोंगरगाव** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय डोंगरगाव**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०१/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# धांदरफळ बु. येथे 'स्वदेश कला उत्सवा' ने ग्रामविकासाचा जागर

## विविध सामाजिक उपक्रमांनी सोहळ्याची सांगता



**संगमनेर खुर्द: (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील कलागुणांना वाव मिळावा आणि सामाजिक प्रश्नांची सोडवणूक व्हावी, या उद्देशाने धांदरफळ बु.येथे आयोजित 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' व 'स्वदेश कला उत्सव २०२६' उत्साहात पार पडला. राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून स्वदेश सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाची सांगता मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत झाली.

या उत्सवाचे उद्घाटन खा.भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, धांदरफळ बु. गावाने ग्रामविकासाची वेगळी दिशा दर्शविली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकोपयोगी उपक्रम राबवून या गावाने प्रगतीची घोडदौड सुरू ठेवली आहे. श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थानच्या विकासासोबतच बाळासाहेब देशमाने आणि ग्रामपंचायतीने ग्रामविकासाचा जो आदर्श ठेवला आहे, तो कौतुकास्पद आहे असे ते म्हणाले.

उत्सवादरम्यान राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, संत गाडगे महाराज आणि सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांची जयंती साजरी करण्यात आली. केवळ मनोरंजन न करता, ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण आणि शेतकरी पुत्रांच्या समस्यांवर भाष्य करणाऱ्या 'नवरदेव' या चित्रपटाचे प्रदर्शन करून जनजागृती करण्यात आली. स्वदेश महिला मंचाच्या वतीने 'उत्सव स्त्री शक्तीचा' अंतर्गत 'लय भारी संगमनेरी होम मिनिस्टर' हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. यामध्ये महिलांसाठी पैठणी, सोन्याची नथ, चांदीचा करंडा, ओव्हन आणि गॅस शेगडी यांसारखी भरघोस बक्षिसे देण्यात आली. गप्पा, उखाणे आणि खेळांच्या माध्यमातून महिलांना विरंगुळा व विचारांचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

सुशिक्षित बेरोजगार आणि बचत गटांसाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. बँकांमार्फत कर्ज वितरण आणि कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले, ज्यामुळे तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेवर आधारित स्वामीराज भिसे आणि रुचिका खोत यांचा 'वारी आडवाटांच्या विठोबाची कीर्तावणी' हा नाट्यप्रयोग सादर झाला. या प्रयोगाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गप्पागोष्टी, गाणे, खेळ, नृत्य, उखाणे याशिवाय महिलांसाठी मनोरंजनाचे आणि विचारांचे व्यासपीठ निर्माण करणारा उपक्रम घेऊन विचाराचे तिळगुळ देऊन हळदीकुंकू समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. तसेच गावातील भूमिपुत्रांच्या कलागुणांचा 'स्वदेश कला गौरव सन्मान २०२६' देऊन गौरव करण्यात आला. उद्धव चंद्रभान गोर्डे यांना कृषी, दुग्ध व्यवसाय व आदर्श कुटुंब, संपत वाकचौरे यांना पारंपारिक लाकडी कला व बाळासाहेब देशमुख यांना ६० वर्षांपासून पारंपारिक शिवणकला (धोतर शिवणकाम) यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच ग्रामविकासासाठी प्रयत्न करणाऱ्या सरपंच उज्वलाताई देशमाने व सर्व ग्रामपंचायत सदस्य, सेवाभावी संस्था यांच्या कार्याला शाबासकी देण्याकरिता मकर संक्रांतीच्या दिवशी राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येतो.

# आता महापौरपदासाठी आरक्षण सोडत कधी?




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि कोल्हापूरसह राज्यातील २९ महानगर पालिकांचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. आता सर्वांना उत्सुकता लागली आहे म्हणजे महापौर कोण होणार आहे. आरक्षण सोडत निघाल्यानंतरच महापौर पदाचा चेहरा ठरणार आहे.

महापौरपदाचे आरक्षण अद्याप जाहीर झाले नाही त्यामुळे नगरसेवकांची उत्सुकता वाढली आहे. पुढील आठवड्यात नगर विकास खाते महापौर सोडत काढणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. तर जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महापौरपदासाठी सोडतून आरक्षण निश्चित केले जाते. सर्वसाधारण पुरूष किंवा महिला, ओबीसी, अनुसूचित जाती व जमाती अशा क्रमाने आरक्षण सोडत काढली जाते. आधी जर सर्वसाधारण गटासाठी महापौरपद असल्यास पुढच्या वेळी म्हणजे आता तो गट वगळून अन्य प्रवर्गाला आरक्षण दिले जाते. जेणेकरून सर्व गटांना सर्वोच्चपद भूषविण्याची संधी मिळेल. आता सर्व २९ महापालिकांचे निकाल लागले आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष महापौर पदाच्या आरक्षणाकडे लागले आहे. ही आरक्षणाची सोडत लवकरच जाहीर केली जाईल. त्यानंतरपर राज्यातील सर्व २९ महापालिकांना महापौर मिळेल.

संपूर्ण राज्याचे लक्ष असलेल्या मुंबई महानगर पालिकेवर महायुतीची सत्ता आली. २२७ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीमध्ये महायुतीचे एकूण ११८ सदस्य निवडून आले. भाजपचे सर्वाधिक ८९ नगरसेवक विजयी झाले आणि भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला. त्यानंतर शिवसेना ठाकरे गट हा दुसरा सर्वात मोठा पक्ष ठरला.

ठाकरेसेनेचे ६५ नगरसेवक विजयी झाले. शिवसेना शिंदे गटाचे २९ नगरसेवक विजयी झाले. त्यानंतर मनसे ६, राष्ट्रवादी शरद पवार गट १, राष्ट्रवादी अजित पवार गट ३, काँग्रेस २४, मनसे ६, इतर २ आणि एमआयएम ८ जागांवर विजयी झाले. मुंबईत भाजपने सर्वात जास्त जागा मिळवल्यामुळे भाजपचाच महापौर होणार हे निश्चित आहे.

राज्यातील २९ महानगर पालिकांमध्ये सर्वात जास्त उमेदवार भाजपचे विजयी झाले आहेत. भाजप १४२५ उमेदवार विजयी झाले. त्यापाठोपाठ सर्वात जास्त ३९९ उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे विजयी झाले.

त्यानंतर काँग्रेसचे ३२४, राष्ट्रवादी अजित पवार गट १६७, शिवसेना ठाकरे गट १५५, राष्ट्रवादी शरद पवार गट ३६, मनसे १३, बहुजन समाजवादी पार्टी ६ आणि एमआयएमचे १२५ उमेदवार विजयी झाले.

यानुसार भाजपचे राज्यात अर्ध्यापेक्षा जास्त नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपने या विजयानंतर राज्यभर एकच जल्लोष केला.

# सरकारचं नवं फर्मान, आता मुस्लिमांना हिंदूंची जमीन खरेदी करता येणार नाही !

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जमीन खरेदी-विक्री संदर्भात भारतात वेगवेगळ्या राज्यांचे वेगवेगळे कायदे आहेत. देशात असे काही राज्य आहेत जिथे बाहेरील राज्यातील लोकांना जमीन खरेदी करता येत नाही.

ईशान्येकडील बहुतांशी राज्यांमधील बाहेरील राज्यांच्या लोकांना जमीन खरेदी करण्यास मनाई आहे. महाराष्ट्र बाबत बोलायचं झालं तर राज्यात शेती योग्य जमीन फक्त शेतकरीच खरेदी करू शकतो. गुजरात मध्ये पण असाच काहीसा नियम आहे.

दरम्यान आता आसाम राज्यात एक वेगळाच निर्णय घेण्यात आला आहे आणि या निर्णयावर आता मोठे वादंग उठण्याची पण शक्यता आहे. आसाम राज्य सरकारने आता मुस्लिमांना हिंदू लोकांकडून जमीन खरेदी करता येणार नाही असा कायदा तयार केला आहे. आसाम राज्य मंत्रिमंडळने या संदर्भातील निर्णय घेतला आहे. CM हिमंता बिस्वा सरमा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. आसाम राज्यात आता हिंदू लोकांची जमीन मुस्लिमांना खरेदी करता येणार नाही. जर हिंदू लोकांची जमीन मुस्लिमांना खरेदी करायची असेल तर अशा प्रकरणात आता तेथे जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता आवश्यक राहणार आहे. हिंदू लोकांकडून मुस्लिमांना जमीन खरेदी करण्यासाठी जिल्हा उपायुक्त किंवा जिल्हाधिकारी यांची मंजुरी मिळाली तरच जमीन खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण होणार आहे. शासनाने राज्यातील सामाजिक आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याची माहिती दिली आहे.

अधिकाऱ्यांनी शासनाच्या या निर्णयामुळे जमिनीच्या व्यवहारांवर प्रशासनाचे नियंत्रण वाढेल असा विश्वास व्यक्त केला आहे. जाणकार सांगतात की या निर्णयामुळे भारतीय मुस्लिमांना कोणताच त्रास सहन करावा लागणार नाही फक्त जमीन खरेदी विक्रीची प्रक्रिया थोडी किचकट होण्याची शक्यता आहे. पण आसाम सरकारने घेतलेला हा निर्णय नव्या राजकीय वादाला तोंड फोडणार आहे. यामुळे आता या निर्णयाच्या विरोधात विरोधी पक्षातील नेते नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे उत्सुकतेचे राहील. तसेच भविष्यात हा निर्णय बंगाल, झारखंड अशा काही राज्यांमध्ये पण लागू केला जाणार का? हे पण पाहण्यासारखे राहणार आहे.

# निमगाव खुर्दच्या सुनबाईची राजकीय भरारी

- म्हाळादेवी गावची लेक काजल गोपाळे वसई–विरार महापालिकेच्या नगरसेविका!



**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच पार पडलेल्या वसई विरार महानगरपालिका निवडणुकीत निमगाव खुर्दच्या सुनबाई व अकोले तालुक्यातील म्हाळादेवी गावची लेक काजल निखिल गोपाळे यांनी दणदणीत विजय मिळवत नगरसेविका पदावर झेप घेतली आहे. बहुजन विकास आघाडी या पक्षातून त्यांनी वार्ड क्रमांक २१-क (महिला – ओपन) मधून ९,९८५ मते मिळवून विजय संपादन केला.

या लढतीत त्यांनी समोरील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार पुनम बिजलानी यांचा पराभव केला. वार्ड क्रमांक २१-क मधून बहुजन विकास आघाडीचे चारपैकी तीन उमेदवार विजयी झाले असून, काजल निखिल गोपाळे, प्रार्थना प्रवीण मुंडे आणि अनिल अनंत भोईर हे तिघे नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत.

गेल्या ३५ वर्षांपासून "ना स्वार्थासाठी, ना सत्तेसाठी—फक्त जनतेच्या सेवेसाठी" या ब्रीदवाक्याने काम करणाऱ्या बहुजन विकास आघाडीने वसई, नालासोपारा व भोईसर विधानसभा मतदारसंघांत तीन आमदार व एक खासदार घडवले आहेत. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत पक्षाचे ७१ नगरसेवक निवडून आल्याने वसई–विरार महानगरपालिकेत बहुजन विकास आघाडीची एकहाती सत्ता प्रस्थापित झाली आहे. याउलट भाजपाचे ४३ उमेदवार विजयी झाले आहेत.

# श्री स्वयंभू गणेश जयंती महोत्सव सोहळा निमित्त कार्यक्रम

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

गणपती फाटा नेतवड येथे श्री स्वयंभू गणेश जयंती महोत्सव सोहळा निमित्त बुधवार दि . २१ ते शुक्रवार दिनांक २३ पर्यंत धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . या कालावधीत कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे :- पहाटे ४ वा. काकडा भजन , स . ६ वा . श्रींचा अभिषेक , सायं . ५ वा . हरिपाठ , रात्री ७ वा. श्रीहरी कीर्तन , रात्री ९ वा. महाप्रसाद , रात्री १० वा . हरीजागर होणार आहे . बुधवार , दि . २१ स . ८ वा . मांडव डहाळे , स . १० वा . विनापूजन व रात्री ७ वा. ह भ प रेखा काकड यांचे हरिकीर्तन . गुरुवार , दि . २२ स . १० वा . श्रींच्या जन्मोत्सवाचे ह भ प मनोहर सिनारे यांचे कीर्तन , दु . १ वा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन.

# ॲड ऋग्वेद गंधे यांची नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक तीन मधून अँड .ऋग्वेद गंधे यांची नगरसेवक पदी निवड झाली. या यशाबद्दल गुलमोहोर रोड येथे राष्ट्रवादी काँग्रेस (२२५) विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे,सावेडी मंडल अध्यक्ष रेणुका करंदीकर ,उपाध्यक्ष श्वेता झोंड, जिल्हा सरचिटणीस ज्योती दांडगे, प्रशांत चौधरी आदींच्या उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्याचा गौरव केला. सत्काराला परिसरातील नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना ऋग्वेद गंधे यांनी मतदारांचे आभार मानले व प्रभागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, शिक्षण व आरोग्य या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्याचे आश्वासन दिले. सर्वांना सोबत घेऊन पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सुमित कुलकर्णी म्हणाले "आज आपल्या परिसरासाठी अभिमानाचा क्षण आहे.

ऋग्वेद गंधे यांची नगरसेवक पदी निवड झाली असून, त्यांच्या कार्यक्षमतेवर व सामाजिक बांधिलकीवर जनतेने विश्वास दाखवला आहे.

त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांतून आपली कामगिरी सिद्ध केली आहे. पुढील काळात ते प्रभागाच्या विकासासाठी नक्कीच प्रभावी नेतृत्व देतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

त्यांच्या कार्यास आम्ही सर्वजण सदैव सहकार्य करू. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर समर्थकांमध्ये राडा

## कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर नालेगावमध्ये चांगलाच राडा झाला. विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी पराभूत उमेदवाराच्या कार्यकर्त्याच्या घरासमोर जावून घोषणाबाजी केली. त्यातून कवडे आणि वाघ समर्थकांमध्ये वादावादी झाली.

या घटनेमुळे नालेगाव परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील नालेगाव परिसरातील लांडे गल्लीत शुक्रवारी रात्री आपसात वादावादी करणाऱ्या चार जणांविरुद्ध कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शांततेचा भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, १६ जानेवारी महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर प्रभाग ११ मधील विजयी उमेदराच्या समर्थकांनी जल्लोष केला. तसेच भाजप पराभूत उमेदवाराच्या कट्टर समर्थकाच्या घरासमोर जावून विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी जल्लोष करत घोषणाबाजी केली. तेथूनच वातावरण तापले.

दोन्ही उमेदवारांचे समर्थक आमने सामने आल्याने नालेगावमध्ये काही काळ तणाव निर्माण झाला होता.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी हस्तक्षेप केल्याने वाद मिटला. दरम्यान, शुक्रवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास नालेगाव येथील लांडे गल्लीत काही तरुण आपसात भांडण करत असल्याची माहिती कोतवाली पोलीस स्टेशनला मिळाली होती.

या माहितीवरून गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, सूरज कदम व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्या ठिकाणी चार जण एकमेकांच्या अंगावर धावून जात वादावादी करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र ते कोणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर पोलिसांनी चौघांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले. त्यांची चौकशी केली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सूरज दिलीप कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.




# गीताताई पाऊलबुधे यांचे वृद्धापकाळाने निधन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्व.माजी आमदार डॉ.नाथ जयवंत पाअलबुधे यांच्या पत्नी श्रीमती गीता नाथ पाऊलबुद्धे यांचे दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्या माजी सभागृह नेता श्री विनीत पाऊलबुद्धे यांच्या मातोश्री होत्या. आज शनिवार दिनांक १७/०१/२०२६ रोजी नगर येथील अमरधामध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# महावितरणच्या हलगर्जीपणामुळे कर्मचाऱ्यांचा मृत्यु

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**



रोहित्रावर दुरुस्तीचे काम सुरु असतांना अचानक विद्युत पुरवठा सुरु केल्याने झिरो कर्मचाऱ्याचा विजेचा शॉक लागुन मृत्यु झाला. शहरातील भूमी अभिलेख कार्यालयासमोर काम करत असतांना झिरो कर्मचारी सोमनाथ आसाराम पानडघळे (वय-२५ वर्ष) रा. आघूर हे तेथील ट्रान्सफार्मरवर दुरुस्तीचे काम करत असतांना विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. परंतु काम सुरु असतांना अचानक विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला. त्यामुळे सोमनाथ पानडघळे यांना जोरात विजेचा धक्का बसला आणि सदरील कर्मचारी हा तारांमध्ये अडकला. त्यामुळे आसपासच्या लोकांनी हे पाहिल्यानंतर आरडा ओरडा सुरु केला त्यानंतर विद्युत पुरवठा खंडीत करुन त्यांना खाली उतरविण्यात आले आणि तात्काळ उपजिल्हा रुग्नालयात दाखल करण्यात आले. परंतु तपासणी अंती वैदयकिय अधिकारी यांनी सदर कर्मचाऱ्याला मृत घोषीत केले यानंतर कर्मचारी सोमनाथ पानडघळे यांचे नातेवाईक आणि ग्रामस्थांनी विद्युत पुरवठा सुरु करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली परंतु संबंधीत काम करणारे ठेकेदार आणि महावितरण कार्यालयातील अभियंता यांनी आपले फोन मोबाईल बंद करून पसार झाले त्यामुळे नातेवाईक व ग्रामस्थ यांनी आक्रमक पवित्रा घेतला आणि मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला परंतु आमदार प्रा. रमेश बोरनारे यांच्या मध्यस्थीने नातेवाईकांनी मृत्यूदेह ताब्यात घेतला व अंत्यसंस्कार केले.

# कन्या विद्यामंदिर, अकोले येथे वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा दिमाखात संपन्न!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



आपण ज्या विद्यालयामध्ये शिक्षण घेतले त्याच विद्यालयाला कधी विसरू नका त्यासाठी उच्च पदावर गेल्यानंतर आपल्या कमाईतील दानधर्म मंदिरांना करण्यापेक्षा शालेय मंदिरामध्ये करा या ठिकाणी सरस्वती आहे या ठिकाणी लक्ष्मी आहे या ठिकाणी ज्ञानोबा आहेत या ठिकाणी तुकाराम महाराज आहेत उद्याच्या आदर्श भारताचे नागरिक घडविण्याचे काम या शिक्षकांकडून होत आहे विद्यार्थ्यांनी देखील ज्या शाळेत शिक्षण घेतले त्या शाळेला विसरू नका असे आव्हान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित कन्या विद्यामंदिर, अकोले येथे सन 2025–26 साठीचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्या प्रसंगी बोलताना व्यक्त केले...... शालेय प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा सोहळा पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मान्यवरांच्या उपस्थितीत संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी सुमधुर आवाजात ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या या गीतांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय व प्रेरणादायी बनवले. विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. लक्ष्मणराव गोर्डे (सचिव, श्री नरेश राऊत फाऊंडेशन, केलवड) होते. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना ध्येय ठरवून सातत्याने परिश्रम करण्याचा सल्ला दिला.

शिक्षणाची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. दरवर्षी इयत्ता दहावीतील प्रथम क्रमांकास ₹5000, द्वितीय ₹3000 व तृतीय ₹2500 रुपये रोख पारितोषिक देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यासोबतच शाळा अधिक आधुनिक व डिजिटल करण्यासाठी 15 संगणक व एक इंटरॅक्टिव्ह बोर्ड देण्याची घोषणा करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

चालू वर्षातील पारितोषिक वितरणात त्यांनी प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास ₹1000 रोख बक्षीस दिले, तसेच विद्यार्थ्यांच्या खाऊसाठी ₹5000 रुपयांची मदत जाहीर केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या मनोगतातून सामाजिक बांधिलकी जपली. विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या सुविधेसाठी ₹30,000 किमतीचा वॉटर फिल्टर देण्याचे त्यांनी जाहीर केले. याशिवाय सर्व विद्यार्थ्यांना बुंदीचे जेवण देण्याची घोषणा करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनीलजी दातीर (अध्यक्ष, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी) होते. सोहळा गिरजाजी जाधव (कायम विश्वस्त) यांच्या शुभहस्ते पार पडला.

याप्रसंगी संस्थेचे सचिव सुधाकरराव देशमुख, खजिनदार धनंजय संत, स्थानिक स्कूल कमिटीच्या अध्यक्षा कल्पनाताई सुरपुरिया, संस्थेचे सदस्य सुधाकरराव आरोटे, रमेशराव जगताप, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, अगस्ति कॉलेजचे प्राचार्य डॉ. भास्करराव शेळके, प्रा. सुनील शिंदे, परफेक्ट इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य मीनाताई नवले आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जया पोखरकर यांनी शैक्षणिक, क्रीडा व कला क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी कन्यारत्न, खेलरत्न व कलारत्न या विशेष पारितोषिकांची घोषणा करून गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव केला. या पुरस्कारांमुळे विद्यार्थिनींमध्ये स्पर्धात्मक वृत्ती व आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका जया पोखरकर यांनी केले. सूत्रसंचालन मंगल आरोटे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभारप्रदर्शन शेळके मॅडम यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पालकवर्गानेही कार्यक्रमाचे कौतुक केले.

एकूणच कन्या विद्यामंदिर, अकोले येथील वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा हा विद्यार्थिनींच्या गुणवत्तेचा गौरव करणारा, त्यांना नवी प्रेरणा देणारा व शाळेच्या प्रगतीचा दिशादर्शक ठरला.

### ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली

# निवडणूक काळात कडेकोट बंदोबस्त, शांतता कायम






**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक साठी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत एकुण पाच प्रभाग असुन 111 मतदान केंद्रावर कडेकोट पोलिस बंदोबस्त सह दोन पोलीस निरीक्षक,30 सहायक व ऊपनिरीक्षक यासह जवळपास सातशे पोहेकॉ, पोलीस अंमलदार व होमगार्ड यांच्यी मतदान केंद्रासह निवडणूक साठी बंदोबस्त ठेवला तर मतमोजणी दिवशी पाच ही प्रभागात पोलीस बंदोबस्त कायम ठेऊन शांततेत निवडणूक प्रक्रिया पार पडली.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या मनपा निवडणूक साठी 15 जानेवारी रोजी मतदानसाठी प्रभाग क्रमांक 19 व 20,11,12,13

भागाच्या समावेश होता तर मनपा निवडणूक मतदानासाठी 111 मतदान केंद्र 32 इमारती मध्ये करण्यात आले होते ,यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्यी निवडणूक बंदोबस्त अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती,

तर ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या सह 30 सहाय्यक पोलीस निरीक्षक, ऊपनिरीक्षक, 248पोहेकॉ, 250पोलीस अंमलदार, 210 होमगार्ड यांच्यी बंदोबस्ता साठी नेमणूक करण्यात आली होती तर हद्दीत पाच ठिकाणी नाके बंदी करण्यात आली होती.

16 जानेवारी रोजी मतमोजणी झाल्यानंतर पोलीस बंदोबस्त कायम ठेऊन परिसरातील विविध भागात पोलिस गस्त ठेऊन विजयी उमेदवार समर्थक यांना सुचना व मार्गदर्शन करून उत्साह कायम ठेऊन सहकार्य करण्याचे आवाहन करून शांतता कायम ठेऊन सहकार्य केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या सह अनेक वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्या मुळे परिसरात शांतता निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली.



छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, न्यू हायस्कूल महालगाव येथील शालेय समितीचे अध्यक्ष मा - अविनाश पाटील गलांडे यांच्या वाढदिवसा निमीत दैनिक समर्थ गांवकरीच्या वतीने साईबाबांची मुर्ती व शॉल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक समर्थ गावकरीचे प्रतिनिधी कुंडलीक वाळेकर, पत्रकार कमलाकर रासने, महेश डुकरे यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात बातम्या...




### कु. मात्रिशिका कांबळे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षकाकडून सन्मान

कंधार (स. गांवकरी) : तालुक्यातील हिंद - कि - चादर श्री.गुरु तेग बहादूरजी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त आयोजीत तालुकास्तरावरील चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यात ती तालुका स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षकडून कौतुक करून सन्मान केला. कु. मात्रिशिका माधव कांबळे सिंदगीकर ही जिल्हा परिषद पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे इयत्ता चौथी मध्ये शिकत असून तिने तालुका स्तरावर चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी कंधार यांच्याकडून तिचे कौतुक व सन्मान करण्यात आला,तर तिच्या शाळेकडून तिचे गोड कौतुक करीत तिचे व पालकांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. कु.मात्रिशिका माधव कांबळे हिचे शैक्षणिक,साजिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.



### प्रभाग क्रमांक १९ व २० मध्ये भाजपाचे नऊ उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक मध्ये स्वबळावर निवडणूक लढविलेल्या भाजपा पक्षाने प्रभाग क्रमांक 19 व 20 मधील नऊ ही ठिकाणी प्रचंड मताधिक्याने विजयी मिळविला आहे. घोषणा होताच सिडको हडको परिसरातील विविध भागात फटाक्यांची आतिषबाजी करून कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जल्लोष साजरा केला.माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नावामनपाचा सार्वत्रिक निवडणूक मध्ये भाजपा पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली यात प्रभाग क्रमांक 20 मध्ये अ गटातून निरंजना राजु लांडगे,बं गटातुन मंगला गजानन देशमुख,क गटांत वैजनाथ ईश्वरराव देशमुख,ड गटात सुवर्णा सतिश बस्वदे,इ गटातुन संजय शिवाजीराव घोगरे व प्रभाग क्रमांक 19 मध्ये अ,गटात अभिषेक रमेश सौदे,बं गटातुन सौ.दिपाली संतोष मोरे,क गटातुन सुलोचना धोंडीबा काकडे,ड गटात अनुराधा राजु काळे पाटील या विजयी झाल्या आहेत. भाजपा, शिवसेना शिंदे व राष्ट्रवादी अजित पवार गट युती, कॉंग्रेस आय व वंचित बहुजन आघाडी,ऊबाठा शिवसेना, यांच्या सह अपक्ष अशा प्रभाग क्रमांक 19 मध्ये चार जागेसाठी 31 उमेदवार तर व 20 मध्ये पाच जागेसाठी 24 उमेदवार निवडणूक रिंगणात होते,यात भाजपाच्या उमेदवारांनी एकतर्फी विजय मिळवला आहे.



### महापे वाहतूक शाखेचा जनजागृती उपक्रम; मोफत मेडिकल चेकअप कॅम्प!

नवी मुंबई (स. गांवकरी) : नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत महापे वाहतूक शाखा यांच्या वतीने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात चालक बांधवांसाठी मोफत मेडिकल चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला. या मेडिकल चेकअपमध्ये चालक बांधवांसह वाहतूक पोलीस अधिकारी व पत्रकार बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान वाहतूक विभागाकडून वाहनचालकांना सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महापे वाहतूक विभागाने आवाहन केले की, वाहन चालवताना हेल्मेट व सीटबेल्टचा वापर अनिवार्यपणे करावा, मोबाईल फोनचा वापर टाळावा तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होईल, असा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

# सुहासिनी महिलांना हळदीकुंकूंचा कार्यक्रम संपन्न

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

खर्डा येथे. समाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी एक आगळा वेगळा असा उपक्रम केला आहे. नवीन पायंडा पाडला आहे. जुन्या पारंपरिक पद्धतीला छेद दिला गेला आहे. विधवा महिलांना समजात सन्मानाची वागणूक दिली पाहिजे.. यासाठी हा उपक्रम अगदी स्तुत्य आहे.

विधवा पण येणे यामधे महिलेचा काहीच दोष नसतो. तरी पण महिलेस समाज सन्मानाची वागणूक देत नाही. ही दुर्दैवाची बाब आहे..

त्यामुळे हा उपक्रम नावीन्यपूर्ण आहे.. आवश्यक आहे. हा नियमीत पणे राबवला पाहिजे.

असे मनोगत एका महिलेने व्यक्त केले. यास्तव ग्रामीण विकास केंद्र व त्यांचे सहकारी यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.



ग्रामीण विकास केंद्र संचालित भटके विमुक्त संसाधन केंद्र खर्डा येथे विधवा परित्यक्ता आणि सुवासिनी या खर्डा परिसरातील सर्व जाती धर्मातील महिलांनी एकत्र येऊन संविधान वाचून हळदी कुंकू आणि सुहासिनींचा वाण आणि तिळगुळ देऊन एकमेकींना सन्मान दिला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्षपदी म्हणून खर्डा गावचे सरपंच सौ. संजीवनी पाटील होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण विकास केंद्र संस्थेचे सचिव उमाताई जाधव उपस्थित होत्या.

यावेळी पाटील यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सर्व महिलानी विधवा परितक्तां महिलांना एकल समजू नये,कोणत्याही महिलेने कुटुंबामध्ये वाद विवाद झाल्यानंतर आईचं घर या ठिकाणी स्वतःचे माहेर समजून यावे.

यावेळी कार्यक्रमासाठी मंजुषा लाड रेश्मा बागवान, अयोध्या गोरे, मीना वाघे, सीमा इंगळे, मंगल शिंगाणे,आरती इंगळे, स्नेहा इंगळे, उषा शिंदे, शोभा शिंदे, लता शिंदे, छाया वाळके, लखूपतीबाई गोलेकर,शोभा ठोकळे, सोनाली पिंपळे, चंद्रकला काळे, सरस्वती लोंढे, अर्चना गोपाळघरे, प्रभावती जाधव, तेजस्विनी लोंढे, आणि इत्यादी उपस्थित होते.

सूत्रसंचालन निता इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रस्तावना उर्मिला कवडे यांनी केले.तर आभार लक्ष्मी दराडे यांनी मानले.

# मंजुळाबाई तुकाराम गायकवाड यांचे निधन

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौजे कोकलेगाव येथील श्रीमती मंजुळाबाई तुकाराम गायकवाड यांचे वयाच्या 85 व्या वर्षी वृध्दपकाळाने दिनांक 16 जानेवारी रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात एक मुलगी तीन नातू पणतू असा परिवार आहे.



मंजुळाबाई तुकाराम गायकवाड यांच्यावर यांच्या पार्थिवावर कोकलेगाव येथे दिनांक 17 जानेवारी रोजी करण्यात आलेल्या अंत्यविधी वेळी श्रीनिवास पाटील चव्हाण,जि.प.सदस्य माणिकराव लोहगावे, डॉ.शंकर गड्डमवार, नगरसेवक दयानंद भालेराव, गणपत रेड्डी, रावसाहेब पवार, श्याम पाटील चोंडे,डोंगरगावचे माजी सरपंच पिराजी डोईवाड, माजी सरपंच मेहतेकर चांदोबा, भीमराव बैलके,पंढरीनाथ नामवाडे, मारुती कांबळे, पंढरीनाथ गायकवाड ईजगावकर यासह कोकलेगाव नगरीतील माजी सरपंच मारोतराव पा.मिरकुटे, भगवान पाटील जुन्ने, सुरेश पाटील शेळगावे, सरपंच प्रतिनिधी हनुमंत पा.मिरकुटे, रामेश्वर बापूले,पत्रकार माधव बैलकवाड यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.सामाजिक कार्यकर्ते सुरेश गायकवाड यांची ती आजी होत.



# विद्यार्थ्यांनी अनुभवली बाजारपेठ!

■ फुलवळच्या श्री बसवेश्वर विद्यालयात 'आनंद नगरी' चा उत्साह

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

श्री बसवेश्वर विद्यालय, फुलवळ येथे क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून १७ जानेवारी रोजी 'आनंद नगरी' चे भव्य आयोजन करण्यात आले होते. शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारी ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, या हेतूने 'कमवा आणि शिका' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून हा उपक्रम राबवण्यात आला.

या आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ आणि वस्तूंचे एकूण ५२ स्टॉल लावले होते. दिवसभरात या स्टॉलच्या माध्यमातून तब्बल ३१ हजार ४०० रुपयांचे संकलन झाले. विशेष म्हणजे, व्यवहाराची शिस्त लागावी म्हणून प्रत्येक स्टॉलधारकाकडून १० रुपये प्रमाणे 'जीएसटी' (GST) संकलित करण्यात आला. या संकलित निधीतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या स्टॉलची निवड करून त्यांना पारितोषिक दिले जाणार आहे.

या उपक्रमाला गावातील पालक आणि माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मंगनाळे बी.एन. सर, आनंद नगरीचे प्रमुख पांचाळ एम.बी. सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या या व्यावहारिक कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रासेयो शिबीर हे विद्यार्थ्यांना लोकाभिमुख सर्वगुणसंपन्न नागरिक बनवते




प्रा. मारुती हनुमंतकर

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर एक व्यासपीठ असून यातून विद्यार्थी लोकाभिमुख सर्व गुणसंपन्न नागरिक बनू शकतो असे विद्यार्थ्यांना संबोधतांना प्रा.मारुती हनुमंतकर राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक नांदेड यांनी प्रतिपादन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारडच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय "सामाजिक स्वास्थ्य व राष्ट्रीय विकासासाठी" विशेष शिबिराचे अर्धापूर तालुक्यातील लहान येथे आयोजन करण्यात आले.

शिबिराचा प्रारंभ लहान येथील सरपंच सदाशिव पाटील इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख उद्घाटन लहान चे पोलीस पाटील छगनराव इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रमेशचंद्र महाजन उपाध्यक्ष स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड,सचिव रामेश्वर कोरबनवाड,सहसचिव अशोकराव गव्हाणे, प्रा.मारुती हनुमंतकर रा.से.यो.जिल्हा समन्वयक नांदेड,बालाजी यशवंतकर रा.से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड. उपसरपंच शेख महबूब शेख रजाक,माजी सरपंच अमोल बालाजी इंगळे,तंटामुक्ती अध्यक्ष गोविंदराव हारकरी,उपाध्यक्ष राजू लोणे,ग्रामविकास अधिकारी रविकांत क्षीरसागर,कृषी सहाय्यक श्रीमती मीनाक्षी पडकंठवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते ग्रामस्वच्छतेचे अग्रदूत श्री संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी प्राचार्य हेमंत इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य हेतू सेवेतून शिक्षण घेत असताना विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून समाजासाठी काम करतो आणि नेतृत्व गुण विकसित करतो असे प्रतिपादन केले.तर अध्यक्षीय समारोप करताना लहान गावचे सरपंच सदाशिवराव इंगळे यांनी शिबिरार्थी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व प्रकारची मदत करण्याची ग्वाही दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एम.जे.पवार यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.परशुराम माने यांनी केले तर आभार प्रा. विशाल लाटकर यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शितल कु.मॅकलवाड कु.माहेश्वरी तुपेकर,कौशल कदम,शिवानंद उबाळे या शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सराईत आरोपींकडुन १९,४२,४७५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

### स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगरची कारवाई

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मिळालेल्या माहितीनुसार दि. १३ रोजी सायंकाळी ६ वा. ते दि. १६/१२/२०२५ रोजीचे १२ वा.चे दरम्यान फिर्यादी हे कुटुंबासह जयपुर येथे नातेवाईकांचे कार्यक्रमास गेले होते. त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराच्या मागील दरवाजाचे लोंक कशानेतरी तोडुन आत प्रवेश करुन घरामध्ये ठेवलेले १४,७५,०००/-रु किमतीचे सोने, डायमंड, चांदी व रोख रक्कम चोरुन नेले आहे.

सदर घटनेबाबत फिर्यादी श्री अशोककुमार विजयकुमार अग्रवाल (रा. बंगला क्र.०६ विराज कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. ११९१/2श२०२५ भारतीय न्याय संहिता २०23 चे कलम ३३१ (३), ३३१(४), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याबाबत मा. श्री सोमनाथ घार्गे साहेब, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर शहरामध्ये घरफोडीचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते.

सदर आदेशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रविंद्र पांडे, सुरेश माळी, गणेश धोत्रे, शाहिद शेख, फुरकान शेख, दिपक घाटकर, बिरप्पा करमल, सतिष भवर, रोहीत येमुल, अमृत आढाव, प्रकाश मांडगे, प्रशांत राठोड, भाग्यश्री भिटे, चालक भगवान धुळे यांचे पथक तयार करुन सदर पथकास घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना करण्यात आले होते. नमुद पथकाने गुन्ह्यातील आरोपींबाबत गोपनिय माहिती व व्यवसायीक कौशल्याचे आधारे माहिती संकलित करुन आरोपीचे शोध घेत असतांना पथकास सदरचा गुन्हा रमेश कुंभार रा. वर्तनगनर ठाणे याने केले असल्याची माहिती मिळाली.या महिन्यात गेल्या दि. १६ रोजी पथकाने नमुद आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव १) रमेश महादेव कुंभार (वय- ४९ रा. अमाप रेसीडेन्सी, फलॅट नं.२०३,



कशेळी, ठाणे) असे असल्याचे सांगीतले. त्यास वरील गुन्हे बाबत विचारपुस करता त्याने सदरचा गुन्हा मी व माझे साथीदार २) आशीष शिंदे रा. बारामती ता.बारामती जि. पुणे (फरार) अशांनी मिळुन केल्याची कबुली दिली आहे. त्यानंतर ताब्यातील आरोपीचे ताब्यातुन व आरोपीचे सांगणे प्रमाणे १५,११,४७५/- रु कि.ची १०४.६७० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड, ४,००,०००/- रु की.ची मारुती सुझुकी कंपनीची SX4 मॉडेलची कार, ३१,०००/- रु की.चे सिल्व्हर रंगाचे मोठे ३१ मोती, एक कटर, मोठे कटर असा एकुण १९,४२,४७५/- रु कि.चा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# समर्थ पॉलिटेक्निकचा हिवाळी परीक्षेचा निकाल ९८.४७%

## ४६ विषयांचा निकाल १००%

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक,बेल्हे या महाविद्यालयाने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.एकूण १२६३ विद्यार्थ्यांपैकी १२१४ विद्यार्थी सर्व विषयात पास (ऑल क्लिअर) झाले असून महाविद्यालयाचा एकूण शेकडा निकाल ९८.४७% इतका लागला आहे.यापैकी १२०२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे १७, तर ८०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे १७६ विद्यार्थी आहेत. एकूण ७४ विषयांपैकी ४६ विषयांचा निकाल १००% लागला आहे.

शाखा निहाय निकाल पुढीलप्रमाणे :- कम्प्युटर इंजिनिअरिंग: द्वितीय वर्ष : काजल झिंजाड(प्रथम- ९३.०६%), अनुराग दांगट(द्वितीय-९१.०६%), समृद्धी सोनवणे(तृतीय- ९०.३५%),तृतीय वर्ष : श्रेया हाडवळे (प्रथम -९४.८२%), सरोदे प्रतीक्षा (द्वितीय), आत्मजा मोरे (तृतीय -९४.१२%) इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी:

द्वितीय वर्ष: श्रवण आवटी (प्रथम-९०.४७ %), अदिती जाधव (द्वितीय -८७.३०%), वैष्णवी नवले (तृतीय- ८५.८८%),तृतीय वर्ष : सानिका कायकर (प्रथम -९४.५९%), विभागून मानसी चंगडिया व स्वरा जाधव (द्वितीय -९४.१२%), अजय शेळके (तृतीय -९०.४७%), इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग: द्वितीय वर्ष : सुरज सुपेकर (प्रथम -७५.७७%), स्नेहल थोरात (द्वितीय- ७५.५३%), विश्वजीत भोर (तृतीय-७५.१८%) तृतीय वर्ष : प्रसाद डुंबरे (प्रथम -८८.००%), प्राची लामखडे (द्वितीय- ८६.४७%), सार्थक कदम (तृतीय -८५.२९%) इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन:

द्वितीय वर्ष : श्रुती आतकरी (प्रथम -८३.२२%), सानिका ढोकरे (द्वितीय -७८.६७%), अलिषा मिस्त्री (तृतीय- ७६.४४%) तृतीय वर्ष : सार्थ हडवळे (प्रथम – ८५.७७%), प्रतीक्षा आहेर (द्वितीय-८४%), सिद्धी खंडागळे (तृतीय- ८०.२३%) मेकॅनिकल इंजिनिअरिंग: द्वितीय वर्ष : भाऊसाहेब गुंड (प्रथम -८५.३३%), अल्फेज जमादार (द्वितीय -८५.२२%), संचित कापसे (तृतीय -८१.७१%)

तृतीय वर्ष : ओमकार झुंद्रे (प्रथम -८१.४१%), यश चिंचवडे (द्वितीय-८०.९४%), तन्मय ताजवे (तृतीय -८०.३५%)

मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग:

द्वितीय वर्ष : ओमकार नरसाळे (प्रथम- ७६.८९%), ज्ञानेश पाडेकर (द्वितीय- ७५%), प्राची लाड (तृतीय - ७३.७८%)

तृतीय वर्ष : आदित्य लोंढे (प्रथम- ८३.५३%), प्रसाद गुंजाळ (द्वितीय-८२.९४%), श्रावणी दारोटे (तृतीय -८२%)

सिव्हिल इंजिनिअरिंग:

द्वितीय वर्ष : शिवम वाघमारे (प्रथम -८०.५९%), ओम भांड (तृतीय - ७९.०६%)

तृतीय वर्ष : अश्विनी नवले (प्रथम - ८१.१२%), कोमल साळवे (द्वितीय - ७७.३३%), रिया आभाने (तृतीय - ७५% )प्रथम वर्ष निकाल : कम्प्युटर: दिव्या बांगर (८७.१८%), निहारिका अदक (८५.२९%), सिद्धी घंगाळे (८४.२४%)

आयटी: श्रद्धा बांगर (८६.८२%), अस्मिता खोडाडे (८२.८२%), चेतना पठारे (८२.२४%)

मेकॅनिकल: सार्थक वाघ (७९.७७%), आर्यन बांगर (७९.२९%), पुष्कर पाचपुते (७७.१८%),इलेक्ट्रिकल: यश पवार (८०.१२%), पूनम बांगर (७७.७७%), विराज नरवडे(७७.५३%)

ई&टीसी: कोमल शिंदे (८२.७१%), राजश्री आवटी (८०.९४%), सार्थक दाते (८०.४७%),सिव्हिल: आलोक चौधरी (८०.७१%), अरमान इनामदार (७९.०६%), अनुष्का बोरुडे (७७.७७%)

मेकॅट्रॉनिक्स: प्रज्वल गायकवाड (७८.४०%),भाग्येश लम्हे (७६%), मयुरेश पोटे ७५.३०%).

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत ,प्राचार्य डॉ.अनिल कपिले,उपप्राचार्य प्रा. संजय कंधारे,प्रा.श्याम फुलपगारे तसेच विभागप्रमुख प्रा.महेंद्र खटाटे,प्रा.संदीप त्रिभुवन,प्रा. आशिष झाडोकार,प्रा.आदिनाथ सातपुते,प्रा.संकेत विगे,प्रा. स्वप्निल नवले आणि संकुलातील सर्व प्राचार्य,विभागप्रमुख यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# "निवडणुका येतील-जातील, पण श्वास मराठीच" — राज ठाकरेंचा कार्यकर्त्यांना निर्धाराचा संदेश!

**(समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका निवडणुकांनंतर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेनेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांचे अभिनंदन करत कार्यकर्त्यांना सस्नेह संदेश दिला आहे. यावेळची निवडणूक सोपी नव्हती. अचाट धनशक्ती व सत्तेच्या ताकदीसमोर शिवशक्ती उभी ठाकल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

राज ठाकरे म्हणाले की, "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी जिद्दीने झुंज दिली. त्यांचे कौतुक शब्दात मांडता येणार नाही." महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अपेक्षित यश न मिळाल्याचे दुःख व्यक्त करतानाच, खचून न जाता पुढील लढाईसाठी सज्ज राहण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.



निवडून आलेले नगरसेवक आपल्या-आपल्या भागातील सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, मराठी माणसाच्या विरोधात काही घडताना दिसले तर ते सत्ताधाऱ्यांना जेरीस आणतील.

"आपली लढाई मराठी माणसाची, मराठी भाषेची, मराठी अस्मितेची आणि समृद्ध महाराष्ट्रासाठीची आहे. ही लढाईच आपले अस्तित्व आहे," असे ठणकावून सांगत राज ठाकरे यांनी दीर्घकालीन संघर्षाची जाणीव कार्यकर्त्यांना करून दिली.

एमएमआर परिसरासह संपूर्ण राज्यात मराठी माणसाला डावलण्याची एकही संधी सत्ताधारी सोडणार नाहीत, त्यामुळे मराठी जनतेच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. "निवडणुका येतील-जातील, पण आपला श्वास मराठी आहे, हे विसरायचे नाही," असे भावनिक आवाहन त्यांनी शेवटी केले. लवकरच भेटून पुन्हा नव्याने पक्ष व संघटना उभारण्याचे संकेत देत राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचा संदेश दिला.



## जालिंदर डोके यांचे निधन

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

कुमशेत गावातील जालिंदर विठ्ठल डोके वय वर्ष ५८ यांचे निधन झाले आहे .यांच्या पाठीमागे पत्नी , एक भाऊ , एक बहीण , दोन मुल , सुना , नातवंडे , पुतणी , पुतण्या , चुलते असा मोठा परिवार आहे. जालिंदर डोके यांचा मुंबई येथे भाजीपाल्याचा व्यवसाय होता. यांचा मुलगा अंकुश हॉटेल व्यवसाय व लहू मुंबई येथे उद्योजक म्हणून कार्यरत आहे.

# कार्यक्षेत्राच्या सीमेच्या आत प्रामाणिक सेवा देणारे सर्व कर्मचारीही सैनिकच – आरटीओ श्री धर्मराज पाटील!




**अकोले : (समर्थ गांवकरी)**

"देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक जसे राष्ट्रसेवा करतात, तसेच आपल्या कार्यक्षेत्राच्या सीमेच्या आत प्रामाणिकपणे सेवा देणारे सर्वच कर्मचारी हेही सैनिकच आहेत," असे प्रतिपादन श्रीरामपूर विभागाचे मोटार वाहन निरीक्षक धर्मराज पाटील यांनी केले.

ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अकोले एस.टी. डेपो येथे इंधन बचत मासिक कार्यक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी आपल्या खास शैलीत इंधन बचतीचे सोपे, व्यवहार्य मार्ग सांगत दैनंदिन कामकाजात इंधनाचा काटेकोर वापर करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे घनश्याम माने यांनी द्रवरूप इंधन हे दुर्मिळ व मर्यादित साधन असल्याने त्याचा अत्यंत काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. इंधनाचा अपव्यय झाल्यास होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून देत, महाराष्ट्रातील लाखभर एस.टी. कर्मचारी एकत्रितपणे ठरविल्यास मोठ्या प्रमाणावर इंधन बचत होऊ शकते आणि पर्यावरणपूरक भूमिका बजावता येईल, असेही ते म्हणाले.

यावेळी पालक अधिकारी शिंदे यांनी अकोले आगार अधिक सकारात्मक व कार्यक्षम कसे करता येईल याबाबत अभ्यासपूर्ण सूचना मांडल्या. आगार व्यवस्थापक दराडे व आगार प्रमुख सांगळे यांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करत आगार नफ्यात आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन वाकचौरे यांनी केले. या कार्यक्रमास आगारातील वाहक, चालक, तंत्रज्ञ तसेच कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात व्याख्यानमालेचे आयोजन

- थोर व्यक्तींच्या चरित्रात माणुसकीची वृंदावने : प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**




शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफण्यात आले. या व्याख्यानमालेचे प्रास्ताविक डॉ. धर्मनाथ काकडे यांनी केले. कै. शिवाजीराव (बापू) नागवडे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या विचारांचा जागर श्रीगोंद्याच्या जनतेपर्यंत पोहोचावा या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून ही व्याख्यानमाला सातत्याने आयोजित केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच व्याख्यानमालेचा उद्देश त्यांनी संक्षिप्तपणे विशद केला. अतिथी परिचय प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी करून दिला. या प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे उपस्थित होते. त्यांनी "उद्याच्या आनंदासाठी" या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. आजच्या समाजातील विविध पैलूंवर भाष्य करताना त्यांनी थोर व्यक्तींची चरित्रे ही समाजासाठी लाखमोलाची असल्याचे सांगितले. समाजकार्य करणाऱ्या थोर व्यक्तींना देवत्व प्राप्त होते; त्यांना मृत्यूचा शाप नसतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आजच्या मूल्यहीन समाजाला थोर व्यक्तींच्या विचारांची नितांत गरज आहे. कै. शिवाजीराव (बापू) नागवडे यांचे विचार, नीतीमूल्ये, साधेपणा, प्रसन्नता व प्रामाणिकपणा यांतून उद्याचे सामर्थ्य निर्माण होऊ शकते, असे त्यांनी अधोरेखित केले. थोर चरित्रातील प्रत्येक पानातून जगण्याची ऊर्जा व आनंद निर्माण होत असून, चरित्रवाचनातून मनाची मशागत होते व त्यातून अमृतासारखी फळे चाखता येतात. अशा चरित्रांमध्ये माणुसकीची वृंदावने दडलेली असतात, असे त्यांनी सांगितले. जीवनाचे मर्म त्यांनी सहा सुखांच्या माध्यमातून उलगडून सांगितले—आरोग्य, संपत्ती, सन्मान, चांगली पत्नी, मुले आणि सहावे सुख म्हणजे प्रयत्नांच्या वाटेवर सातत्याने चालत राहिल्यास यश निश्चित मिळते. जगण्याची खरी शिदोरी आई-वडिलांच्या विचारांत दडलेली असते. आयुष्यातील बेरंग चित्रात सुंदर रंग भरता आले पाहिजेत, असे सांगत वास्तव जीवनातील उदाहरणांद्वारे त्यांनी "उद्याच्या आनंदाची" परिभाषा स्पष्ट केली.

## देवदर्शनापलीकडे भक्तीचा खरा अर्थ

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथे मकर संक्रांत व षट्तिला एकादशीच्या निमित्ताने भक्तीचा एक वेगळाच, समाजाभिमुख आदर्श पाहायला मिळाला. हे सण केवळ धार्मिक विधींचे नसून आत्मपरीक्षणाचेही दिवस आहेत, याची प्रचिती या उपक्रमातून आली. या पवित्र दिवशी अनेक भाविक मंदिरात दर्शनासाठी जातात, नवस बोलतात आणि पुढे निघून जातात. मात्र ढवळगाव येथे काही जागरूक ग्रामस्थांनी कोणताही गाजावाजा न करता मंदिर व ग्रामपंचायत परिसरात स्वयंस्फूर्तीने स्वच्छतेचे श्रमदान केले. या कृतीतून त्यांनी भक्तीचा खरा अर्थ समाजासमोर ठळकपणे मांडला. हे श्रमदान केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित नव्हते, तर धार्मिकतेला सामाजिक जबाबदारीची जोड देणारे एक ठोस पाऊल ठरले.




ठाणे महापालिका निवडणुकीत दिवा प्रभाग क्र २७, २८ व २९ मधील शिवसेनेच्या नवनिर्वाचित १० विजयी नगरसेवकांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. प्रसंगी रमाकांत मढवी, शैलेश पाटील, आदेश भगत, दिपाली भगत, स्नेहा पाटील, दीपक जाधव, दर्शना म्हात्रे साक्षी मढवी, बाबाजी पाटील, अर्चना पाटील या सर्व विजयी नगरसेवकांचे त्यांनी हार्दिक अभिनंदन करत पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जनतेने आपल्यावर विश्वास ठेवून प्रचंड मताधिक्याने विजयी केले आहे. या विश्वासाला सार्थ ठरवत सर्वांनी प्रभागात उत्तम पद्धतीने काम करा असे आवाहनही खासदारांनी यावेळी केले. प्रसंगी शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते... (फोटो - संतोष पडवळ )

## ग्रामीण मातीची ताकद शहरी सत्ताकेंद्रात!

**श्रीगोंदा तालुका :(समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील अरणगाव दुमाला येथील बाळासाहेब दामू सातव यांची धाडसी कन्या तसेच उद्योजक आशिष लहानु शिंदे यांच्या मावशी श्वेता मुकुंद गलांडे यांनी पुरुषप्रधान राजकारणाला थेट आव्हान देत पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका पदावर दणदणीत विजय मिळवला आहे. ग्रामीण भागातून पुढे येत थेट शहरी सत्ताकेंद्रात प्रवेश करणाऱ्या या महिला नेतृत्वाच्या यशकथेमुळे त्या हजारो महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

घर, कुटुंब आणि समाजाने घालून दिलेल्या मर्यादा झुगारून देत त्यांनी राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. महिला सुरक्षा, स्वाभिमान, शिक्षण, आरोग्य, रोजगार तसेच नागरी



सुविधा या मूलभूत मुद्द्यांवर त्यांनी आक्रमक व स्पष्ट भूमिका घेत जनतेचा विश्वास संपादन केला. केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कामाच्या जोरावर त्यांनी आपले नेतृत्व सिद्ध केले आहे.

ही निवड केवळ एका पदापुरती मर्यादित नसून, ती महिलांच्या हक्कांचा व स्वाभिमानाचा विजय मानली जात आहे.

# योग्य नियोजनाने ग्रामीण विद्यार्थीही होऊ शकतात स्पर्धा परीक्षेत यशस्वी

- अतिरिक्त पोलीस महासंचालक महेश भागवत
- बाबूजी आव्हाड महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**




एमपीएससी व युपीएससी परीक्षेत यश मिळवण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी माध्यम असा फरक नसून या स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर पूर्ण क्षमतेने स्मार्ट वर्क केले पाहिजे. कोणत्याही अडचणीचे भांडवल न करता प्रामाणिकपणे या परीक्षांना सामोरे गेले तर यश नक्की मिळते. योग्य नियोजनाने ग्रामीण विद्यार्थीही कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतात असे प्रतिपादन तेलंगना राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक महेश भागवत यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड तर व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बबन चौरे, विवेकानंद विद्या मंदिरचे मुख्याध्यापक शरद मेढे उपस्थित होते.

महेश भागवत पुढे म्हणाले, या वर्षीपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेचा अभ्यासक्रम बदलला असून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर वर्णनात्मक करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही परीक्षांचा एकाच वेळी अभ्यास करणे शक्य होणार आहे. आज मोबाईल व इंटरनेट मुळे विद्यार्थ्यांमध्ये लिखाणाचे स्कील कमी झाले आहे. जोपर्यंत शिक्षणाचा पाया भक्कम होत नाही तोपर्यंत यश मिळणे दुरापास्त आहे. राज्य सरकारच्या धोरणानुसार नववी पर्यंत विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याचे दुष्परिणाम खूप झाले. विद्यार्थ्यांनी नेहमी उच्च ध्येय ठेवणे आवश्यक असून पदवीच्या प्रथम वर्षात आल्यानंतर लगेच युपीएससी परीक्षांची तयारी सुरु केल्यास अपेक्षित ध्येय लवकर गाठले जाऊ शकते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना परीक्षार्थी होणे खूप महत्वाचे असून तीन तासाच्या वेळेत सोडविलेला पेपर परीक्षा तपासणाऱ्या व्यक्तीच्या नजरेत भरायला हवा. यासाठी हार्ड वर्क पेक्षाही स्मार्ट वर्क करणे महत्वाचे आहे. आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर कोणीतरी आयडॉल आपल्यासमोर ठेवायला हवा. पाथर्डी तालुक्यातून युपीएससीचा टक्का वाढतोय ही आपल्यासाठी भुषनावह बाब आहे. आपल्याला कोणत्या क्षेत्रात करियर करायचे हे सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी ठरवणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा ही खूप वेळखाऊ प्रक्रिया असून त्यासाठी संयम असणे खूप महत्वाचे आहे. प्रयत्नात सातत्य, सकारात्मक दृष्टीकोन, कठोर मेहनत व दुर्दम्य इच्छाशक्ती असल्यास कोणत्याही परीक्षेत प्राविण्य मिळविता येते. सध्या स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्यासाठी प्रचंड स्पर्धा आहे. प्रत्येकासाठी वेळ खूप मौल्यवान असून या क्षेत्रात करियर करायचे असल्यास दिवस रात्र एक करून अभ्यास करा, यश निश्चित मिळेल.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयाने क्रीडा, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ बबन चौरे व सहकारी महाविद्यालयाची कामगिरी उंचावत आहेत असे ते शेवटी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे, सूत्रसंचालन डॉ. अभिमन्यू ढोरमारे तर आभार प्रा.दत्तप्रसाद पालवे यांनी मानले.

# आदिवासी मुलांच्या जगातली-मनातली अद्भुत



## संपादकीय

नाटक करायला मला लहानपणापासून आवडायचं, पण 'आयुष्यात चोवीस तास नाटक करायचा निर्णय घेऊया का 'या विचाराची सुरुवात मात्र पुण्याला ललित कला केंद्रात प्रवेश घेतला तेव्हा झाली. खेड्यातून नाटकाच्या ओढीने शहरात आलेली मुलगी नाटकाबद्दल जो विचार करते तो 'मोठं स्टेज, मोठ्ठ नेपथ्य, मेकअप, कॉस्च्युम 'असा काहीसा मर्यादित असतो. नाटक म्हणजे हे सगळं आहेच, पण फक्त तेवढंच नाही हा विचार मला ललित कला केंद्राने दिला.'तुम्ही जिथून आलात, तुमची जी रूट्स आहेत, तुमच्या मातीतल्या लोककला, संस्कृती हेही तुमच्या नाटकाचा भाग असू शकेल 'ही दृष्टी मला तिथे मिळाली.'अप्लाईड थिएटर 'किंवा उपयोजित रंगभूमी हा विषय आनंद चाबुकस्वार आम्हाला शिकवायचे. त्यातून नाटक हे 'टूल' वापरून आपण समाजातल्या वेगवेगळ्या घटकांसाठी कसं आणि काय काम करू शकू हा विचार मला मिळाला. त्यानंतर माझ्या आयुष्यात 'गोष्टरंग 'ही फेलोशिप आली.

२०१५-१६ मध्ये मी गीतांजली कुलकर्णी यांचं 'पिया बेहरुपिया 'हे नाटक पाहिलं होतं. त्या नाटकातलं तिचं काम बघून मी अक्षरशः भारावले होते.'गोष्टरंग 'मुळे मला गीतांजली ताईच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर बालरंगभूमीचा अभ्यास करायला मिळाला.

पालघरच्या वाडा तालुक्यात वडवली सोनाळे या गावी अतुल आणि गीतांजली कुलकर्णी यांचं एक टुमदार घर आहे. याच घराच्या खालच्या बाजूला त्यांनी एक नाट्यावकाश तयार केलाय. या अवकाशाचं नाव तारपा! ही इथल्या मुलामुलींसाठी एक हक्काची जागा आहे. पहिल्यांदा मी 'तारपा 'मधल्या माझ्या छोट्या मित्रमैत्रिणींना घेऊन माधुरी पुरंदरेंचं 'वेडा वारा 'बसवलं होतं. तेव्हा गीतांजली ताई म्हणाली, 'हे एवढ्यावर थांबता नये'. ते वाक्य माझ्या डोक्यात राहिलं होतं.

नंतर एका वेगळ्या कामासाठी सोनाळ्याला गेले असताना मुलांशी गप्पा सुरू होत्या.'चला, तुमचं Mumbai Main Page No. 6 Jan 17, 2026 Powered by: erelego.com एखादं गाणं तयार करूया 'असं म्हणत आम्ही गाणं बसवलं. या मुलांचं गाण्याचं, तालासुराचं ज्ञान हे खास त्यांच्या मातीतलं आणि अस्सल आहे. आम्ही त्यांचं गाणं बसवलं तेव्हा असं बसल्या बसल्या, आपलं स्वतःचं गाणं, आपल्यासमोर तयार झालं याची त्यांना खूप गंमत वाटली.

ही 'जिकनी 'ची सुरुवात होती. आदिवासींच्या भाषेत 'जिकनी 'म्हणजे कोडं! या मुलांच्या भावविश्वातल्या गप्पा, चर्चा, गाणी, नाट्यखेळ अशा अनेक गोष्टींतून 'जिकनी 'हा प्रयोग आकाराला येत गेला. दरम्यान मी 'झी 'चा एक 'रिॲलिटी शो 'केला. तिथे झालेल्या कौतुकाकडे तटस्थपणे बघताना माझ्या एक लक्षात आलं ते म्हणजे मी नाटकवालीच आहे. फिल्म, वेबसिरीज, एखादी आर्टफिल्म करायला मला नक्की आवडेल, पण नाटकात होणारा प्रत्यक्ष संवादच मला जास्त भावतो.'जिकनी 'केलं तेव्हा त्यात काम करणारी सगळी मुलं नाटक करणारी नव्हती. त्यामुळे हे नाटक त्यांच्या कलाने पुढे जात राहिलं. माझ्यासारख्या एरवी नाटक करताना अगदी कठोर शिस्तीच्या दिग्दर्शिकेसाठी हे सोपं नव्हतं. पण जमवलं. एखादी गोष्ट नीट जमेपर्यंत शंभर वेळा करायची वगैरे हे या मुलांना आवडत नसे. त्यांना कंटाळा यायचा. पण त्यांच्या कलाने घेत घेत 'जिकनी 'उभं राहिलं. आम्ही या नाटकाच्या पूर्ण प्रवासात त्या 'प्रोसेस 'चा विचार जास्त केला. त्यातून काही 'प्रॉडक्ट' मिळणार आहे का, हा विचार तेव्हा आमच्यासाठी दुय्यम होता.'जिकनी' पूर्ण झाल्यावर आम्ही ते मुलांच्या आई-बाबांनाच दाखवलं. त्यांना ते प्रचंड आवडलं... मग आम्ही ते बाहेर दाखवून पहावं, असा विचार केला आणि 'प्रयोग 'सुरू झाले. अनेक वर्षे 'तारपा 'मध्ये येऊन या मुलांबरोबर काम करणाऱ्या दिग्गजांनी या कामाचं कौतुक केलं,'बाहेरच्या जगाचा, त्यातल्या कृत्रिमतेचा स्पर्शही 'जिकनी 'ला नाही,'या प्रतिक्रियांनी मुलं खुश झाली आहेत, मी सुखावले आहे. माझं मन समाधानाने काठोकाठ भरलेलं आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | 1 | | | 5 |
| 9 | | | | | | | | 3 |
| 4 | 1 | | | | | 9 | 2 | |
| 5 | 6 | | 4 | | 2 | 7 | | 8 |
| | | 1 | 9 | | 5 | 2 | | |
| 2 | | 4 | 7 | | 8 | | 5 | 1 |
| | 7 | 8 | | | | | 4 | 2 |
| 3 | | | | | | | | 9 |
| 1 | | | 8 | | | 6 | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 2 | 7 | 1 | 9 | 6 | 8 | 5 |
| 1 | 8 | 5 | 4 | 6 | 2 | 9 | 7 | 3 |
| 7 | 9 | 6 | 5 | 8 | 3 | 2 | 4 | 1 |
| 6 | 1 | 4 | 9 | 3 | 5 | 7 | 2 | 8 |
| 2 | 5 | 3 | 8 | 4 | 7 | 1 | 9 | 6 |
| 8 | 7 | 9 | 6 | 2 | 1 | 5 | 3 | 4 |
| 4 | 3 | 7 | 1 | 9 | 6 | 8 | 5 | 2 |
| 9 | 2 | 1 | 3 | 5 | 8 | 4 | 6 | 7 |
| 5 | 6 | 8 | 2 | 7 | 4 | 3 | 1 | 9 |

| | | |
|---|---|---|
| विक्रम संवत्- २०८२ | कृष्ण पक्ष | करण:चतुष्पाद |
| पौष शके संवत्- १९४७ | तिथि:अमावस्या | १२:४६:०६ |
| संवत्सर - विश्वावसूनाम | २५:२१:४४+ | करण:नाग २५:२१:४४+ |
| अयन- उत्तरायणारंभ | नक्षत्र:पूर्वाषाढा | सूर्य:मकर |
| मास- पौष | १०:१३:५५ | चन्द्र:मकर१६:४०:४१ |
| ऋतु- सौर शिशिर | योग:हर्षण २१:१०:३१ | हिजरी सन् - १४४६ |

## उपदेशाचे डोस

### ‘जादूगार’ नरेंद्र

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. तो शाळेत असतानाची ही गोष्ट. ‘सिरापिस’ नावाची एक ब्रिटिश युद्धनौका खिदरपूरच्या घाटावर नांगरून पडली होती. नरेंद्र आणि त्याच्या मित्रांच्या मनात आले की, आपण ती आतून पहावी पण त्यांना आत सोडणार कोण? मग एके दिवशी त्यांना कळले की, जवळच्या बंगल्यात राहणारा एक ब्रिटिश अधिकारी नौका पाहण्यासाठीच्या प्रवेशिका देतो. लगेच हे सगळे मित्र तेथे जाऊन पोहोचले पण बंगल्याचा रक्षक त्यांना आत जाऊ देईना, सगळी मुले त्याच्याभोवती गोळा होऊन त्याच्याशी हुज्जत घालू लागली पण तो कोणास दाद लागू देईना.

एवढ्यात त्या बंगल्याच्या दारातून नरेंद्र हसत हसत आणि हातात प्रवेशिका नाचवित बाहेर आला. सगळ्यांनी एकच जल्लोष केला. रक्षक तर आश्चर्यचकितच झाला. त्याने नरेंद्राला विचारले, ‘काय रे, तू कसा काय आत घुसलास?’ त्यावर नरेंद्र त्याला म्हणाला, ‘तुम्हाला ठाऊक नाही - मी एक जादूगार आहे. मी अदृश्य झालो. आत गेलो आणि साहेबापुढे पुन्हा प्रकट होऊन प्रवेशिका घेऊन आलो.’ तो रक्षक आ वासून बघत असताना सर्वजण युद्धनौकेकडे जाण्यास निघाले. वाटेत मित्रांनी खरे काय झाले ते विचारल्यावर नरेंद्र त्यांना म्हणाला, ‘अरे कसली जादू अन् कसलं काय ! तुम्ही त्याच्याशी हुज्जत घालत होता तेव्हा माझ्या लक्षात आलं की, त्या बंगल्याला मागच्या बाजूलाही एक दार आहे म्हणून मग मी गुपचूप मागे जाऊन त्या दारानं साहेबांकडे गेलो आणि आणल्या प्रवेशिका !’

कथा उपदेश : वेळप्रसंगी युक्तीचा वापर केल्यास ती यशस्वी होते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ३३६ - संत मार्क पोपपदी.
- ३५० - रोमन सेनापती मॅग्नॅन्टीयसने सम्राट कॉन्स्टान्सला पदच्युत केले व स्वत-ला रोमन सम्राट घोषित केले.

### राष्ट्रीय

- १९९५ - अनिल कुंबळेने कर्नाटककडून खेळताना केरळच्या ९९ धावात १६ बळी घेतल्या.
- २००७- महाराष्ट्र-ऑंटारिओ दरम्यान उद्योग-व्यापार सहकार्यवृद्धी करार.


### जन्म

- ८८५ - डाइगो, जपानी सम्राट यांचे जन्म.
- १८४९ - एडमंड बार्टन, ऑस्ट्रेलियाचा पहिला पंतप्रधान यांचे जन्म.
- १८५४ - थॉमस वॅटसन, अलेक्झांडर ग्रॅहाम बेलचा मदतनीस, पहिल्या दूरध्वनी संभाषणातील भागीदार यांचे जन्म.
- १८९२ - ऑलिव्हर हार्डी, अमेरिकन अभिनेता. लॉरेल आणि हार्डीया जोडीतील अर्धा भाग यांचे जन्म.
- १९४४ - पॉल कीटिंग, ऑस्ट्रेलियाचा २४व्या पंतप्रधान यांचे जन्म.

### निधन

- ४७४ - लिओ पहिला, बायझेन्टाईन सम्राट यांचे निधन.
- १३६७ - पेद्रो पहिला, पोर्तुगालचा राजा यांचे निधन.
- १४७१ - गो-हानाझोनो, जपानी सम्राट यांचे निधन.
- १८६२ - जॉन टायलर, अमेरिकेचा १०वा अध्यक्ष यांचे निधन.
- १९२७ - कार्लोटा, मेक्सिकोची सम्राज्ञी यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७२



### आडवे शब्द

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मत्र
१०. शर्त, पण
१२. फायदा, कल्याण
१३. जन्म
१४. माझे
१५. रमापती
१६. डग्याची साथीदार
१७. वाळा
१८. चांदणी
२०. सीतेला पळविणारा
२२. आवड, उत्कट इच्छा
२४. धातूचा धागा
२५. नरमच्या विरुद्ध
२७. भीमाजवळचे शस्त्र
२९. उथळ पाण्याचा आवाज
३०. नवरा (ग्रा.)
३१. 'रामचरित मानस' लिहिणारे
३३. कामदेव
३४. अंजन
३६. शहराचा भाग, पेठ, पूर्ण
३८. भारवाहक
३९. थंडावा
४०. सगळीकडे
४१. चलनवलन
४२. श्रीयुत
४४. व्यापारी फायदा
४६. पाप
४७. धाव, आघात
४९. वक्र
५२. आवरण
५४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५६. 'दिव्यावरील' अंधार!
५८. लिहिताना डावीकडे सोडलेली मोकळी जागा
५९. साखळी असलेला दिवा
६०. जंगला
६२. मैत्रीण
६३. निकट, जवळ
६५. गुल होणारा दिवा!
६६. समशेर
६९. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७०. कायदेशीर नसलेले
७२. स्त्री भूत
७३. नड, आवश्यकता
७४. डाकुंचा प्रमुख
७५. अंगरखा
७७. आंध्रमधून आलेली भटकी जमात
७८. नमस्कार
८१. झोपेचे खोबरे
८२. रात्रीचा पाऊस
८३. वस्तू निर्मितीची जागा

### उभे शब्द

१. धनको, धनवान
२. बाई, स्त्री
३.सांगलीतील पूर्वीचे संस्थान
४. सुकुमार
५. अंत:करण
७. बस्तान
८. मृत्यूचा राजा
९. मृत्यू
१०. सेपे नसलेले
११. चेष्टा
१७. अफूचे बीज
१९. संतापी
२१. आशीर्वाद
२३. मायेची सावली
२५. मनोरंजन करणारा
२६. भालप्रदेश
२७. विटी-दांडूचा खड्डा
२८. विदुराला हिणवताना वापरले गेलेले संबोधन
३१. मंजिऱ्यांचे रोपटे
३२. बायको (सं.)
३३. स्निग्ध औषध
३५. भारतीय सैनिक
३७. भविष्यकथनासाठी उपयोगी मानला जाणारा मणी
३८. मिठाईचा एक प्रकार
३९. गाणे म्हणणारा
४१. हस्तलाघव
४३. काहीजणांसाठी हे निद्रासन ठरते!
४५. बरगडी
४६. चौथा हिस्सा
४८. पहारेकरी,
५०. दरोडा
५१. चर्चा, विचारविनिमय
५२. सत्व, ताकद
५३. अजून, जास्त
५५. वर-वधूची मिरवणूक
५७. जिम्मेदार
६१. समीक्षक
६२. रंग बदलणारा प्राणी
६४. गरजू, अडलेला
६७. मध्यस्थ
६८. फुकाची पायपीट
६९. सुसर
७०. हरभरा डाळीचे पीठ
७१. जेव्हा
७५. मैत्री
७६. सर्वसत्ताधीश, भूपती
७९. औषध
८०. संगीतातील पलटे

### शब्दकोडे क्र. ७१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कुलवधू ४.कानवला ७.रगमतगमत १२.माग १३.पहेलवान १५.मगर १६.नोट १७.रब १८.लव १९.राजराणी २१.मोह २२.वग २४.जयजयकार २८.खास २९.रज ३१.कसाबसा ३३.सावज ३६.मासेमारी ३८.हर हर ४०.तन मन ४३.पाडवा ४५.सवत ४६.पापा ४७.मकर ४८.कल्प ४९.कळस ५०.सतत ५१.साव ५२.मत ५४.लगत ५६.टपाल ५८.टोळ ५९.सहज ६२.पोक ६३.बरसात ६५.कोरी ६६.अवयव ६७.दामचुंबक ६९.याचक ७०.ठार मारणे ७३.तगर ७५.रूस ७७.मानव ७९.जर ८०.रसद ८४.नरकवास ८५.साम ८६.मनमुराद

उभे उत्तर : १.कुमारवय २.लगबग ३.धूप ४.कालवण ५.नव ६.वनराज ७.रमणीय ८.मग ९.तर १०.मनोहर ११.तट १४.हेल २०.राजस २१.मोका २३.कसाब २५.जर २६. यजमान २६अ.खासा २७.वसाहत २८.खाज ३०.परिवार ३१.कवडसा ३२.साहस ३४.वर ३५.मौन ३७.मादक ३९.रवरव ४०.तपास ४१.मद्रास ४३.पारखणे ४४.वायफट ४६.पाळत ४७.मतलब ४९.कमळ ५१.साल ५३.ना हरकत ५७.पाणवठा ५८.टोकदार ५९.सबब ६०.जसा ६१.ठेंव ६४.तयार ६५.कोंकरू ६६.असामान्य ६८.मणेर ७१.रजक ७२.मारवा ७४.गरम ७६.सरोद ७८.वन ८१.ससा ८२.दम ८३.चमू

# फडणवीस आणि रविंद्र चव्हाण हेच धुरंधर

(समर्थ गांवकरी)



महापालिका निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या प्रचाराला राज्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे पाठिंबा व्यक्त केल्याचे चित्र निकालांमुळे स्पष्ट झाले आणि त्याच बरोबर शहरी मतदाराची अचूक नस माहिती असलेल्या भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या विचारधारेसोबत राहण्याच्या आवाहनाला मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे निकालांवरून दिसले. मागील वर्षी जानेवारीत रविंद्र चव्हाण यांनी भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्यांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले होते तिथेच ते अर्धी लढाई जिंकल्याचे आज या दणदणीत विजयाने स्पष्ट झाले.

भाजपा हा धोरण आखणारा आणि धोरण राबविणारा पक्ष आहे. निवडणुकांचे नियोजन, तिकीट वाटप, सभांचे नियोजन याबरोबरच विरोधी पक्षांना जोखण्याचे कसब “देवेंद्र आणि रविंद्र” या भाजपाच्या जोडीकडे आहे. सरकार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश पक्ष यातील समन्वयाचे हे यश असल्याने हा अभूतपूर्व विजय मिळाल्याचे विश्लेषण राजकीय पंडितांनी केले आहे. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे शीर्षस्थ नेतृत्त्व म्हणून पक्षासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी रविंद्र चव्हाण यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात बोलून दाखवलेली. त्यांच्या रूपाने भाजपाला रस्त्यावर उतरून आंदोलन केलेला आणि मातीशी जोडलेला कार्यकर्ता अध्यक्ष म्हणून मिळाला. निवडणूक काळातील वक्तव्याने, पेहरावाने झालेल्या वैयक्तिक स्वरूपाच्या टीकेमुळे रविंद्र चव्हाण बिलकुल विचलित झाले नाहीत.

उलट त्यांनी विरोधकांना जनतेसाठी अनावश्यक अशा विषयात गुंतवून ठेवून, भाजपासाठी विजयाची वाट अधिक सुकर केल्याचे स्पष्ट झाले. विरोधकांनी चव्हाण यांच्यावर केलेल्या वैयक्तिक टीकेला जनतेच्या दृष्टीने कवडीमोल किंमत असल्याचेही या निमित्ताने दिसले. २५ वर्षांच्या राजकीय वाटचालीत रविंद्र चव्हाण त्यांच्यावर झालेल्या प्रत्येक टीकेनंतर एक पाऊल पुढे जातानाच दिसले.

याचे कारणच कायम संघर्ष करून यश संपादन केलेला रविंद्र चव्हाण यांच्यासारखा नेता महाराष्ट्रातील जनतेने अजून नीटसा पाहिलेला वा ओळखलेला नाही आणि राजकीय निरीक्षकांनी अजून अभ्यासलेला नाही. रविंद्र चव्हाण हे अत्यंत मुरलेले आणि मुरब्बी राजकारणी म्हणून महाराष्ट्रात आजच्या भाजपाच्या विजयाने उदयास आलेले आहेत हे दिसले.

देवेंद्र फडणवीस यांना रविंद्र चव्हाण यांची बलस्थानं माहिती आहेत. पक्षासाठी २४ तास समर्पित अध्यक्ष म्हणून त्यांचे महत्त्व फडणवीस जाणून आहेत.


रविंद्र चव्हाण यांचा शहरी महाराष्ट्राच्या राजकारणाचा अनुभव आणि त्यांची कायम "निवडणूक सिद्धता" म्हणजेच इलेक्शन रेडीनेस अशा स्वरूपाची कार्यशैली देवेंद्र फडणवीस ओळखून आहेत. त्यातच अडीच वर्षे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम करताना अवघा महाराष्ट्र पिंजून काढत रविंद्र चव्हाण यांनी खात्याच्या माध्यमातून विकासकामे करताना संपूर्ण महाराष्ट्रात हेरलेली आणि पेरलेली माणसं ही भाजपासाठी महत्त्वाची ठरली असं दिसत आहे.

# “रुकम कॅपिटल स्टडी - बियॉन्ड मेट्रोज

राष्ट्रीयः (समर्थ गांवकरी)

भारतातील उपभोग-नेतृत्वाखालील वाढ आता मोठ्या महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. मागणी, उद्योजकता आणि दीर्घकालीन आर्थिक गती टियर 2 आणि टियर 3 शहरे, उदयोन्मुख शहरे आणि लहान शहरांमध्येही वाढत आहे. सुरुवातीच्या टप्प्यातील ग्राहक ब्रँडना समर्थन देणारी व्हेंचर कॅपिटल फर्म रुकम कॅपिटलने त्यांचा नवीनतम संशोधन अहवाल "बियॉन्ड मेट्रो: द रिअल स्टोरी ऑफ इंडियाज नेक्स्ट 500 मिलियन" प्रकाशित केला आहे, जो मेट्रो नसलेले ग्राहक ब्रँड कसे शोधतात, त्यावर विश्वास ठेवतात आणि खरेदी करतात हे उघड करतो.

रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय भागीदार अर्चना जहागीरदार म्हणाल्या, “भारताकडे बऱ्याच काळापासून मेट्रो शहरांच्या दृष्टिकोनातून




पाहिले जात आहे, ज्यामुळे ग्राहकांबद्दलची आपली समज मर्यादित झाली आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की ग्राहक अधिक आत्मविश्वासू होत आहेत. ते विचारपूर्वक खरेदी करतात, सखोल संशोधन करतात, समुदायाच्या शिफारशींवर अवलंबून असतात आणि जाहिरातींपेक्षा ठोस पुराव्यांवर विश्वास ठेवतात. हे ग्राहक केवळ इच्छेनुसार खरेदी करत नाहीत, तर त्यांच्या गरजांनुसार माहितीपूर्ण निर्णय घेतात. म्हणूनच, ब्रँड्सनी विश्वास निर्माण करणे, वापरण्यास सोपी उत्पादने डिझाइन करणे आणि स्थानिक गरजा पूर्ण करणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तरच त्यांची शाश्वत आणि दीर्घकालीन वाढ सुनिश्चित होईल.”

हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा भारतातील आर्थिक क्रियाकलाप महानगरांच्या पलीकडे जात आहेत. भारतातील 65% लोकसंख्या टियर 2, टियर 3 आणि ग्रामीण भागात राहते. अहवालानुसार, जीएसटी अंमलबजावणीची सोपी अंमलबजावणी, परवडणाऱ्या किमती, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जलद विस्तार, सर्वव्यापी 3जी/4जी कव्हरेज आणि यूपीआयची सुरुवात यासारख्या अनेक प्रगतीमुळे भारतातील लहान शहरे उपभोग वाढीचे पुढील प्रमुख इंजिन बनली आहेत.

# मुंबईचा अविक अग्रवाल ठरला एसबीआय लाइफ स्पेल बी सीझन 15 चा 'स्पेल मास्टर ऑफ इंडिया'

मुंबई: (समर्थ गांवकरी)




भारतातील सर्वात जुन्या स्पेलिंग स्पर्धांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ स्पेल बी स्पर्धेचा महाअंतिम सोहळा नुकताच पार पडला. आणि मिर्चीच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाच्या 15व्या पर्वाची यशस्वी सांगता झाली. मुंबईतील पवई येथील बॉम्बे स्कॉटिश स्कूलचा अकरा वर्षांचा मास्टर अविक अग्रवाल हा या चुरशीच्या स्पर्धेत विजेता ठरला. देशभरातील 300 शाळांमधील 1.25 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेचा विजेता ठरलेल्या अविकने 'स्पेल मास्टर ऑफ इंडिया' हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय किताब पटकावला.

भारतीय अभिनेत्री, फॅशन डिझायनर आणि टीव्हीवरील निवेदिका सुश्री मंदिरा बेदी यांनी या महाअंतिम सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. देशातील अव्वल तरुण स्पेलर्समध्ये यावेळी अटीतटीची स्पर्धा पाहायला मिळाली. अनेक स्पर्धात्मक फेऱ्यांमधून पुढे येत या स्पर्धकांनी आपली शब्दलेखनाची अचूकता, शब्दसंग्रह आणि प्रसंगावधान सिद्ध केले होते. लखनौच्या द मिलेनियम स्कूलचा 13 वर्षीय कुशाग्र पांडे याने दुसरा क्रमांक पटकावला, तर जयपूरच्या भारतीय विद्या भवन, प्रताप नगर येथील 13 वर्षीय जस्मिन जोनवाल हा तृतीय विजेता ठरला. या संपूर्ण स्पर्धेत अंतिम फेरीतील सर्व स्पर्धकांनी उत्तम भाषिक कौशल्ये आणि सातत्य दाखवले.

राष्ट्रीय विजेता म्हणून, अविक अग्रवालला त्याच्या कामगिरीबद्दल आणि स्पर्धेतील प्रगतीबद्दल बक्षीस म्हणून 1,00,000 रुपयांचे रोख पारितोषिक आणि सर्व खर्चासहित हाँगकाँगमधील डिस्नेलँडच्या सहलीने सन्मानित करण्यात आले.

# एमएक्स प्लेयरच्या बिंदीया के बाहुबली सीझन 2 मध्ये पुन्हा परतलाय; ट्रेलर प्रसिद्ध

- 'बिंदिया के बाहुबली सीझन 2' 21 जानेवारी 2026 पासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रीमिंग

(समर्थ गांवकरी)




ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सर्व्हिस असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज बहुप्रतिक्षित ‘बिंदिया के बाहुबली सीझन 2’चा ट्रेलर प्रदर्शित केला. ज्यात चक्रम दावन कुटुंबातील बदलत्या शक्तीची गतिशीलता तसेच वाढत्या अशांततेची झलक दिली आहे. ‘बिंदिया’ या काल्पनिक शहरावर आधारित, नवीन अध्यायाचा पहिला सीझन जिथे संपला होता, तिथेच दुसरा सुरू होतो. तुरुंगात असलेला बडा दावन प्रतिस्पर्ध्यांशी शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत असतो. आपला मुलगा छोटे दावन याने आपली पुरुषसत्ताक गादी चालवावी अशी त्याची इच्छा असते. सत्तेचे डाव, विश्वासघात आणि कौटुंबिक उलथापालथीचे चक्र प्रेक्षकांना कुटुंब, राजकारण आणि खोलवरच्या महत्त्वाकांक्षेत गुंतवून ठेवते. या चक्रम नाट्यात घडामोडींवर ताबा नसल्याने पुरेपूर मनोरंजन होते.

बिंदिया के बाहुबली सीझन 2 मध्ये सौरभ शुक्ला, रणवीर शौरी, दिव्येंदु भट्टाचार्य, सीमा बिस्वास, सुशांत सिंग, शीबा चड्ढा, सई ताम्हणकर, तनिष्ठा चॅटर्जी, विनीत कुमार आणि आकाश दहिया यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

हा नवीन ट्रेलर बिंदियामधील तणाव वाढवण्यात वेळ वाया घालवत नाही. तो दावन कुटुंबातील समीकरणांमध्ये बदल होत असल्याचे संकेत देतो. मोठा दावन (सौरभ शुक्ला)च्या जागेवर बसलेला छोटा दावन नेतृत्वाच्या अगदी वेगळ्या कल्पनेसह साम्राज्य स्वत:च्या मार्गाने चालवण्याचा प्रयत्न करतो. परिणामी आजवर कुटुंबात असलेला गोंधळ रस्त्यांवर येतो. सर्वात मोठा धोका बाहेरील शत्रू नसून आतली महत्त्वाकांक्षा असल्याची जाणीव दावनना होत असल्याने, या ट्रेलरमध्ये कृतीपूर्ण संघर्ष, बदलती निष्ठा आणि सर्वसमावेशक युद्धाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या शहराची खिल्ली उडवली आहे.

सिरीजच्या पुनरागमनाबद्दल बोलताना, ॲमेझॉन एमएक्स प्लेयर’चे डायरेक्टर आणि हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, “आम्ही ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर, पूर्णपणे मनोरंजक तसेच मूळ आणि समर्पक कथा सांगण्याचा प्रयत्न करतो. ‘बिंदिया के बाहुबली’ ही एक आगळीवेगळी मालिका आहे. ज्यात गुन्हेगारी आणि कौटुंबिक संघर्ष यांचा अतिशय अस्सल पद्धतीने मेळ घातला आहे. नवीन आव्हाने आणि बदलत्या नातेसंबंधांसह सीझन 2 या जगाला पुढे घेऊन जातो. सिरीजमधील विनोद, विचित्र पात्रे आणि छोट्या शहरातील बडबड्या व्यक्तिरेखांच्या यांचे मिश्रण दोन्ही सीझनना साजेसे आहे. परंतु यावेळी जमवून आणलेली भट्टी अफलातून आहे. हा पुढचा अध्याय प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.”

बडा दावनची भूमिका पुन्हा एकदा साकारताना सौरभ शुक्ला यांनी सांगितले की, “हे कथानक प्रेक्षक पसंतीचे ठरले कारण या सगळ्या गोंधळातला भावनिक प्रामाणिकपणा! ही पात्रे सदोष, शक्तिशाली आणि सखोल मानवी आहेत. सीझन 2 कुटुंबातील रस्सीखेच वाढवतो, नवीन संघर्ष, विनोद आणि अनपेक्षित वळणांमुळे प्रत्येकाला स्वत:च्या मर्यादेपर्यंत ढकलते.”

# बॉन्डटाइटने रणबीर कपूरसोबत ॲडहेसिव्हच्या भारतीय बाजारपेठेची पुनर्रचना करण्यासाठी घेतली धाडसी झेप

(समर्थ गांवकरी)




सुमारे ३० वर्षांहून अधिक कालावधीचा वारसा लाभलेल्या भारतातील सर्वात विश्वासार्ह ॲडहेसिव्ह (गोंद) ब्रँडपैकी एक असलेल्या ॲस्ट्रल लिमिटेडच्या बॉन्डटाइटने आपल्या नवीन ब्रँड मोहिमेच्या शुभारंभासह एक महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे– भारतीय गोंद बाजारात दर्जेदार ब्रँड म्हणून आपले स्थान अधिक दृढ करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक निर्णायक पाऊल आहे.

या धोरणात्मक पावलाचा एक भाग म्हणून, बॉन्डटाइटने सुप्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर याची ब्रँड चेहरा म्हणून निवड केली आहे. विश्वासार्हता, अष्टपैलुत्व आणि पिढ्यानपिढ्या असलेले व्यापक आकर्षण यांसाठी ओळखला जाणारा रणबीर कपूर बॉन्डटाइटच्या ब्रँड मूल्यांशी सुसंगत असा चेहरा ठरतो आणि विश्वास व सापेक्षतेची ठोस भावना निर्माण करतो. ब्रँडसोबतच्या या हातमिळवणीमुळे सर्व प्रकारच्या चिकटविण्याच्या (ॲडहेसिव्ह) गरजांसाठी समानार्थी नाव बनण्याच्या बॉन्डटाइटच्या दृष्टीकोनाला नवे बळ मिळते.

आगामी कॅम्पेनमध्ये लाकडासाठी वापरण्यात येणाऱ्या गोंद घटकांवर, म्हणजेच वूड ॲडहेसिव्हवर, संवादाचा केंद्रबिंदू ठेवण्यात आला आहे. ही अशी एक श्रेणी (कॅटेगरी) आहे जी ब्रँडसाठी मजबूत चालना देणारी ठरते. लाकडासाठी वापरण्यात येणाऱ्या ॲडहेसिव्ह व्यतिरिक्त, बॉन्डटाइटकडे इपोक्सी आणि सायनोएक्रिलेट (जलद) ॲडहेसिव्हचा भक्कम पोर्टफोलिओही आहे, जो उद्योग, व्यवसाय आणि घरांमधील निर्मिती व दुरुस्तीच्या विविध गरजा प्रभावीपणे पूर्ण करतो. कॅम्पेनच्या लॉन्चनंतर बोलताना, ॲस्ट्रल लिमिटेड (ॲडहेसिव्ह्ज अँड पेंट्स) चे सीईओ सौम्या इंजिनियर म्हणाले:

“३ दशकांहून अधिक काळ बॉन्डटाइटने कामगिरी आणि सातत्य यांच्या जोरावर बाजारपेठेचा विश्वास संपादन केला आहे.

एका सशक्त सेलिब्रिटी भागीदारीच्या पाठबळासह सादर करण्यात आलेले हे नवीन कॅम्पेन, विशेषतः पांढऱ्या गोंद (ॲडहेसिव्ह) विभागातील विकासाला गती देण्यासाठी आमचा नव्याने निर्माण झालेला उत्साह आणि आत्मविश्वास अधोरेखित करते. व्यावसायिक, कारागीर आणि ग्राहकांसाठी एक शक्तिशाली व विश्वासार्ह पर्याय ठरणारा राष्ट्रीय स्तरावरचा विश्वासू ब्रँड उभारून भारतीय ॲडहेसिव्ह बाजारपेठेचा विकास साधणे हा आमचा दृष्टिकोन आहे.

# दोन ईटीएफ फंड ऑफ फंड्स लॉन्च

पुणे: (समर्थ गांवकरी)

बंधन म्युच्युअल फंडने बंधन गोल्ड ईटीएफ एफओएफ आणि बंधन सिल्व्हर ईटीएफ एफओएफ या दोन ओपन-एंडेड योजनांच्या शुभारंभाची घोषणा केली आहे. या योजना गुंतवणूकदारांना सोने आणि चांदीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी एक सोपा, पारदर्शक आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत. नवीन फंड ऑफर (एनएफओ) १२ जानेवारी २०२६ रोजी सुरू झाला असून, २० जानेवारी रोजी बंद होणार आहे. बंधन गोल्ड ईटीएफ एफओएफ आणि बंधन सिल्व्हर ईटीएफ एफओएफमध्ये गुंतवणूक परवानाधारक म्युच्युअल फंड वितरक, गुंतवणूक सल्लागार, ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा थेट https://bandhanmutual.com/campaign/nfo/ या संकेतस्थळावरून करता येईल.



खेड तालुक्याचे शिवसेनेचे(शिंदे गट) नेते युवकांचे मार्गदर्शक सन्माननीय श्री.अतुल भाऊ देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशन या संस्थेचे वैदू समाजाचे. दिनदर्शिका (चौथे वर्ष) अंकाचे प्रकाशन केले. यावेळी अखिल महाराष्ट्र वैदु समाज विकास फाउंडेशन कार्याध्यक्ष व माजी सरपंच, प्रबंधक- हुतात्मा राजगुरू महाविद्यालय चे श्री नारायण शिंदे यांच्या समवेत सर्व कार्यकर्ते च्या उपस्थितीत.

# TECNO Spark Go 3 लॉंच

नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)




काही दिवस अंदाजे असतात, तर काही दिवस नाहीत. हे लक्षात घेऊन, TECNO ने आज Spark Go3 लॉंच करण्याची घोषणा केली, हा स्मार्टफोन भारतातील दैनंदिन कामगार, विद्यार्थी आणि व्यस्त तरुण व्यावसायिकांसाठी डिझाइन केलेला आहे ज्यांना विश्वासार्ह आणि तडजोड न करता सर्वोत्तम कनेक्टिव्हिटी देणारे उपकरण हवे आहे. "देश जैसा दमदार" या तत्वज्ञानावर आधारित, TECNO Spark Go3 एक अशी चमक आणते जी वापरकर्त्यांना थोडे अधिक उजळण्यास मदत करते. ज्यांना एक उत्तम दिसणारा फोन हवा आहे जो दैनंदिन, वास्तविक जगाच्या अनिश्चिततेला आत्मविश्वासाने हाताळू शकेल अशा लोकांसाठी डिझाइन केलेला आहे. लॉंचिंगप्रसंगी बोलताना, टेक्नो मोबाईल इंडियाचे सीईओ श्री. अरिजीत तलपात्रा म्हणाले, "भारताच्या तरुण ग्राहकांना अशा स्मार्टफोनची आवश्यकता आहे जे त्यांच्या दैनंदिन गतीशी जुळवून घेऊ शकतील. टेक्नो स्पार्क गो३ सह, आम्ही एक असे उपकरण आणत आहोत जे त्यांच्या जीवनशैलीला अनुकूल असलेल्या डिझाइनमध्ये मजबूतपणा, बुद्धिमत्ता आणि विश्वासार्ह कनेक्टिव्हिटीचे संयोजन करते. आमच्या 'देश जैसा दमदार' तत्वज्ञानाप्रमाणे, स्पार्क गो३ पहिल्या दिवसापासून सातत्यपूर्ण कामगिरी आणि आत्मविश्वास देण्यासाठी तयार केले आहे."

# मुंबईत सत्ता बदलली, पण ‘ठाकरे फॅक्टर’ कायम

## भाजपचं यश मर्यादित, काँग्रेसला आत्मचिंतनाची गरज!

मुंबई: (समर्थ गांवकरी)



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप–शिंदे गटाच्या ताब्यात मुंबई जाणार हे जवळपास निश्चित असलं, तरी भारतीय जनता पक्षाचे प्रदर्शन फार नेत्रदीपक म्हणावं असं नाही, अशी राजकीय चर्चा सध्या रंगली आहे.

मागील निवडणुकीत भाजपकडे ८२ जागा होत्या, त्या यंदा ९० वर पोहोचल्या. म्हणजेच सत्तेची ताकद, केंद्र ते राज्यातील सत्ता आणि यंत्रणांचा पाठिंबा असतानाही भाजपला केवळ आठ जागांचीच वाढ करता आली. त्यामुळे “चित्र फार बदललं” असं ठामपणे म्हणता येत नाही, असं राजकीय विश्लेषकांचं मत आहे.

दुसरीकडे, २०१७ मध्ये एकसंध असलेल्या शिवसेनेचे ८४ नगरसेवक होते. त्यापैकी ५० पेक्षा जास्त नगरसेवक फुटीनंतरही स्वतःला खरी शिवसेना म्हणवणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या गटाला मुंबईत अपेक्षित यश मिळालं नाही. उलट, शून्यातून सुरुवात करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या गटाने वरचढ ठरण्याची कामगिरी केली. आज मुंबईतील सत्ता उद्धव ठाकरे यांच्या हातातून गेली हे खरं असलं, तरी “उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही अस्तित्वाची लढाई आहे” असा जो प्रचार करण्यात आला होता, तसं चित्र निकालात दिसून आलं नाही. उलट, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मुंबईत तब्बल ६५ जागा मिळाल्या असून ते दुसऱ्या स्थानावर आहेत.

सर्वत्र अपयश पदरी पडत असताना, परिस्थिती पूर्णतः प्रतिकूल असतानाही मिळवलेलं हे यश “मुंबईत ठाकरे फॅक्टर संपलेला नाही” हे स्पष्टपणे दाखवून देणारं आहे, असं राजकीय निरीक्षक मानतात.

दरम्यान, राजकारणात ‘जर-तर’ला फारसा अर्थ नसला, तरी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वबळाचा आग्रह धरला नसता तर मुंबईतील चित्र काहीसं वेगळं दिसलं असतं, अशी चर्चा आहे. भाजपशी प्रभावी मुकाबला करायचा असेल तर वैचारिक मुद्द्यांवर फार ताण न देता काँग्रेसला काही तडजोडी कराव्याच लागतील, असंही मत व्यक्त केलं जात आहे.

अन्यथा, काँग्रेस स्वतःच अधिक कमकुवत होण्याचा धोका असून त्याचा फटका प्रादेशिक पक्षांनाही बसू शकतो. यंदाच्या निकालात काँग्रेस ३० वरून थेट १५ जागांवर आली आहे. या घटलेल्या जागा तरी पक्षाला आत्मचिंतन करण्यास भाग पाडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शेवटी, या निवडणुकीत विजयी ठरलेल्या भाजप, दोन्ही शिवसेना गट तसेच इतर सर्व विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

